## प्रकरण पहिले

## गडहिंग्लज तालुका सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी

# प्रकरण पहिले

## गडहिंग्लज तालुका सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी

लोकशाही शासन व्यवस्थेत राजकीय पक्षाचे स्थान महत्वपूर्ण असते. राजकीय पक्षांच्या अस्तित्वामुळे लोकांना आपापले मतभेद शांततापूर्ण मार्गांनी वेशीवर टांगता येतात. राजकारण हे नेहमीच कोणत्या एका पातळीवर न चालता विविध स्तरावर चालत असते. भारतीय राजकारणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी विचारात घेताना स्थानिक राजकारणाचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते. कारण स्थानिक राजकारणावरच राज्य आणि केंद्र स्तरांवरील राजकारण अवलंबून असते. पक्षविहिन लोकशाही केवळ स्वप्नरंजन आहे. समुद्रावर लाटा जितक्या नैसर्गिक, तितकेच राजकीय पक्ष लोकशाहीत अनिवार्य आहेत. भारतातील राजकारणात तालुका पातळीवरील राजकारणही महत्वाचे असते. गडहिंग्लज तालुक्यातील पक्षीय राजकारणाचा सन १९८५ ते १९९५ पर्यंतच्या कालावधीचा टीकात्मक अभ्यास प्रस्तुत प्रबंधामध्ये करण्यात आला आहे. गडहिंग्लज तालुक्यातील पक्षीय राजकारणाचा अभ्यास करीत असताना कोल्हापूर जिल्ह्यातील राजकारणाची पार्श्वभूमी विचारात घ्यावी लागते. राजकारणात सत्तेला महत्व असते. त्यात सत्तासंघर्ष असतो. पक्षांतर्गत असणारे विविध गट आणि त्यांचे नेते आपल्या हाती सत्ता केंद्रीत व्हावी यासाठी सतत प्रयत्नशील असतात. राजकारणात सत्ताप्राप्तीबरोबरच सत्ता मूल्यांचे वितरण महत्वाचे असते. गडहिंग्लज तालुका हा कोल्हापूर जिल्ह्यातील डोंगराळ भागातील असून आर्थिक आणि सामाजिक दृष्टया अविकसित राहिला आहे. सन १९८५ नंतर या तालुक्यामध्ये नवे राजकीय नेतृत्व उभे राहिले. या उदयोन्मुख नव्या नेत्यांनी गडहिंग्लज तालुक्याच्या विकासासाठी प्रयत्न सुरु केले.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार करीत असताना महाराष्ट्राची आर्थिक-सामाजिक रचना लक्षात घेणे आवश्यक आहे. राजकीय संघटन, राजकीय संस्थांचे कामकाज, नेतृत्व आणि इतर राजकीय हालचाली बदलत्या. आर्थिक - सामाजिक परिस्थितीला जोडलेल्या असतात. राजकारणाचा अभ्यास करीत असताना आर्थिक - सामाजिक परिस्थितीचे भान ठेवणे आवश्यक असते. राजकीय संस्थांच्या धोरणाचा, निर्णय प्रक्रियेचा, नेतृत्व विचारधारणेचा परिणाम आर्थिक सामाजिक बदलावर होत असतो. आर्थिक-सामाजिक बदलाला दिशा देणे, त्यास गती देणे आणि सत्तेचे वाटप करणे याबाबत राजकारण महत्वाची भूमिका बजावत असते. [१]

## स्थानिक राजकारणाचा आणि राज्यस्तरावरील राजकारणाचा संबंध :

महाराष्ट्रात १९६० नंतर स्थानिक राजकारणास नवे महत्व प्राप्त झाले. १९५८ पासून भारत सरकारने गांधीवादी विचारसरणीनुसार "लोकशाही विकेंद्रीकरणाचा" किंवा "पंचायत राज्य" या धोरणाचा राज्यसरकारनी स्वीकार करावा असे धोरण आखले. सत्तेच्या निर्णय प्रक्रियेत आणि आर्थिक धोरण ठरविण्यात जिल्हा आणि तालुका पातळीवरील घटकांना महत्व प्राप्त झाले. याविषयी डोनाल्ड बी. रोसेन्थाल म्हणतात, "From 1959, however, the Government of India began to actively encourage the states to adopt laws in keeping with Gandhian ideals of "democratic decentralisation" or "Panchayat Raj" as it came to be known. In priviciple, that scheme would involve the devolution of decision making authority and finances to

district and subdistrict levels." [2]

१९६२ साली पंचायत राज्य संस्थांची स्थापना झाली. कृषि उत्पादनावर प्रक्रिया करणारे, साखर कारखाने निर्माण झाले. जिल्हा-परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती इत्यादींद्वारा सत्तेचे विकेंद्रीकरण केल्यामुळे ग्रामीण आर्थिक विकासाला मोठीच मदत झाली. ही राजकीय सत्तास्थाने आणि सहकारी बँका, भूविकास बँका, सहकारी सोसायटया इत्यादी आर्थिक सत्तास्थाने ही परस्परांना समांतर आणि पूरक आहेत. या स्थानावर बसून ग्रामीण सत्ताधारी वर्ग तालुका आणि जिल्हास्तरावर आणि तेथून राज्यस्तरावर प्रभुत्व गाजवितो. या कामी त्याला सहकारी साखर संस्थांचाही वापर करता येतो. [3]

राजकीय सत्ता मिळविण्यासाठी राजकीय पक्ष व नेते, धर्म, जात, वर्ग, प्रदेश व त्या विभागातील लोकोपयोगी कार्य यांचा वापर करु लागले. राजकीय सत्ता राजकीय संस्थाद्वारे मिळते. म्हणून तालुक्यातील महत्वाच्या राजकीय संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न झाला. यातूनच गटबाजी सुरु झाली. भारतात आणि महाराष्ट्रात काँग्रेसचे एकछत्री वर्चस्व असल्यामुळे इतर विरोधी पक्षात न जाता पक्षांतर्गत गट निर्माण झाले. म्हणून स्थानिक राजकारण हे विविध गटातील राजकारण बनले. या गटांच्या राजकारणातील पुढा-यांची इच्छा शेवटी आमदार बनण्याची असते. कारण आमदार बनल्यानंतर मुंबईच्या राज्यस्तरीय सत्ताकेंद्राशी संबंध जुळतो, त्यातून मंत्रीपद मिळण्याची व राजकीय क्षितिजे जास्त रुंद होण्याची शक्यता असते.

म्हणूनच जिल्हा राजकारणाबद्दल लिहिताना प्रा. रजनी कोठारी म्हणतात,

"The district politics is the basis for the state and national level politics. There exists, however, a tendency of upward mobility among the leaders of acquiring at lower levels. The prospects of acquiring power appeared first at the district level." [4]

ग्रामीण राजकारणाचे धागेदोरे येथेच गुंतले आहेत. निवडणुकीच्या व इतर सर्व राजकारणाकरिता नव्या संस्थांचा आणि सत्तास्थानांचा उपयोग केला जातो. राजकीय पक्षांची बांधणी वैचारिक व सैध्दांतिक आधारावर करण्यापेक्षा सत्तास्थानांच्या वाटपावर करण्यात आली. आपण संस्थात्मक दबाव व प्रशासकीय यंत्रणेद्वारे सर्वसामान्य जनतेला आपल्या पाठीमागे ठेवू शकतो, ही भावना प्रबळ झाली. निवडणुका याच आधारावर लढविल्या जातात. पक्षांची बांधणी याच आधारावर केली जाते. कार्यकर्त्यांचे संच याच सूत्राने तयार केले जातात. राजकीय प्रबोधन, संघटन व आंदोलनाद्वारे प्रश्न सोडविण्याबाबतची उदासीनता निर्माण झाली. पक्ष संघटना मोडकळीस आल्या आहेत, काही हितसंबंधी गटच पक्षांतर्गत कार्य करताना दिसतात. यात भर म्हणून साखर कारखाने व इतर सहकारी संस्था यातून निर्माण झालेल्या काळ्या पैशानेही राजकारणात महत्वपूर्ण भूमिका बजावली. काळ्या पैशाच्या आधारावर राजकारणात यशस्वी होता येते, ही पक्की मनोधारणा गावपातळीपर्यंत निर्माण झाली आहे.

स्थानिक राजकारण मुख्यत: चार पायावर आधारलेले आहे. या राजकारणात भाग घेणारे पुढारी जात, वर्ग, स्थानिक संस्था आणि

सत्ताधारी राजकीय पक्षा यांच्या साहाय्याने राजकारण करीत असताना आपणास दिसतात. हे पुढारी प्रामुख्याने सधन मध्यम शेतकरी जातीतून आलेले असून वर्गीयदृष्टया त्यांचे संबंध बागायतदारांशी आणि सत्ताधारी भांडवलदार वर्गाशी आहेत. पंचायत संस्था, नगर-पालिका आणि सहकारी संस्था ताब्यात घेऊन ते सत्तेचे राजकारण करतात आणि या राजकारणात सत्ताधारी काँग्रेस पक्षातील विविध गटांच्या राजकारणाचा ते भाग आहेत. महाराष्ट्राच्या गेल्या ३५ वर्षांच्या राजकारणात कमी अधिक प्रमाणात हीच व्यवस्था कायम राहिलेली आपणास दिसते.

महाराष्ट्राच्या राजकारणाची बीजे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सापडतात. कारण संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्याशिवाय ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट होणार नाही आणि सहकारी चळवळीच्या माध्यमातून समाजवाद येणार नाही असे चळवळीच्या सूत्र-धारांचे मत होते.

## महाराष्ट्र राज्य निर्मितीमागच्या प्रेरणा व स्वरूप :

महाराष्ट्र राज्यनिर्मिती ही महाराष्ट्रीय जनसमूहाच्या ऐतिहासिक संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे फलित होय. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही काही मराठी जनतेच्या केवळ भाषिक अस्मितेचा भावनात्मक उद्रेक किंवा उमाळा नव्हता. केवळ मराठी भाषेचे राज्य एवढीच संकुचित भावना व प्रेरणा त्यापाठीमागे नव्हती. भारतीय राज्यघटनेत जी मूल्ये अंगभूत आहेत त्या मूल्यांच्या आधारावर महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रावर

मराठी भाषिकांचा जो जनसमूह आहे त्या जनसमूहाच्या जीवनाची नवउभारणी करणे, त्या मूल्यांचा आविष्कार व अनुभव देणारी समाजव्यवस्था निर्माण करणे हा क्रांतिकारक उद्देश त्या जनआंदोलनामागे होता. महाराष्ट्रीय जनमाणसाची घडण घडण व महाराष्ट्रातील भौतिक परिस्थिती या क्रांतिकारी परिवर्तनाला अनुकूल आहे. मराठी जनतेच्या या अंगभूत शक्तीचा उन्मेष संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात दिसून आला. या सुप्तशक्ती चळवळीत उफाळून आल्या. त्यांच्या प्रभावाने व दबावाने महाराष्ट्र राज्यनिर्मिती झाली. "महाराष्ट्र जगला तर राष्ट्र जगेल" या सेनापती बापटांच्या वा "समाजवादाचा पाळणा प्रथम महाराष्ट्रात हालेल" या श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या उद्गारात मराठी मनाचे व मताचे दर्शन घडते.[६]

## संयुक्त महाराष्ट्र चळवळ :

१९५२ साली भारताची पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. या निवडणुकीनंतर मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून मोरारजी देसाई आले. मोरारजींनी आपल्या मंत्रीमंडळात ग्रामीण भागातील दोन मातब्बर नेते घेतले. एक भाऊसाहेब हिरे आणि दुसरे यशवंतरावजी चव्हाण होय. मुंबई राज्य हे बहुभाषिक राज्य होते. दरम्यान भारतीय राजकारणामध्ये भाषिक राज्यांच्या मागणीचे आंदोलन उभे राहिले. विशेषत: आंध्रमध्ये मोठेच आंदोलन उभे राहिले. या उग्र आंदोलनामुळे भाषिक तत्वावर आंध्रचे स्वतंत्र राज्यही निर्माण झाले.

याच भाषिक तत्वावर महाराष्ट्रातपण "संयुक्त महाराष्ट्र समिती" स्थापन झाली. ही समिती म्हणजे एकप्रकारची प्रचंड अशी चळवळच

होती. यामध्ये शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिष्ट, प्रजासमाजवादी, जन संघ समाजवादी इत्यादी बहुतेक सर्व विरोधी पक्ष सामील झालेले होते. समितीने व्यापक अशी चळवळ सुरु केली. या चळवळीला कॉ. श्रीपाद अमृत डांगे, साथी एस्.एम्. जोशी, नानासाहेब गोरे, उध्दवराव पाटील, क्रांतीसिंह नाना पाटील, आचार्य प्र.के. अत्रे, सेनापती बापट इत्यादी मान्यवर व लोकप्रिय नेत्यांचे नेतृत्व लाभले.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीने अवघा महाराष्ट्र ढवळून काढला. मोरारजी देसाई यांच्या सरकारने ही चळवळ दडपण्याकरिता १०५ जणांचे बळी घेतले. मोरारजी व कॉंग्रेस याबद्दल प्रचंड वादळ उठले. याच प्रश्नावर प्रसिध्द अर्थतज्ज्ञ श्री. चिंतामणराव देशमुख यांनी अर्थमंत्री म्हणून केंद्रीय मंत्रीमंडळाचा राजीनामा दिला. यामुळे संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न देशव्यापी बनला. तशात १९५७ साली दुसरी निवडणूक झाली. यामध्ये महाराष्ट्राच्या बहुतेक भागात कॉंग्रेसचे पानिपत झाले. अनेक ठिकाणी दारुण पराभव झाला. कॉंग्रेस पक्षावर नामुष्कीची पाळी आली. केवळ गुजरात, सौराष्ट्र, विदर्भ व मराठवाडयामुळे कॉंग्रेसला बहुमत मिळाले.[७]

यशवंतराव चव्हाण व बाळासाहेब देसाई यांनी याच सुमारास प्रचंड निधी गोळा करुन प्रतापगडावर श्री. शिवछत्रपतींचा पूर्णाकृती अश्वारुढ पुतळा उभा केला व शिवप्रेमाने का होईना महाराष्ट्रीय जनतेला चुचकारण्यासाठी पंडीत नेहरुंच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण नोव्हेंबर, १९५७ मध्ये उरकण्याचा घाट घातला. तीन चार जिल्ह्यात हजारो ट्रक पाठवून भाडोत्री लोक गोळा केले. पण महाराष्ट्राच्या पश्चिम भागातून

त्यांच्याहीपेक्षा संख्येने अधिक लोक संयुक्त महाराष्ट्र समितीच्या भाई डांगे, एस्.एम्. जोशी, क्रांतीसिंह नाना पाटील आदि नेत्यांच्या नेतृत्वाखाली द-याखो-यात दीड दोन दिवस उन्हातानात काळे झेंडे घेऊन घोषणा देत आलेले पाहून खरा महाराष्ट्र कोठे आहे ? तो का दुखावला आहे ? हे लोकशाही प्रेमी पंडीत नेहरूंनी ओळखले. अखेर १ मे, १९६० रोजी मुंबई राजधानीसह संयुक्त महाराष्ट्राचे उद्घाटन नेहरूंच्याच हस्ते झाले. [८]

## महाराष्ट्र राज्याची स्थापना :

महाराष्ट्र राज्य १ मे, १९६० रोजी अस्तित्वात आले. त्यापूर्वी १ नोव्हेंबर, १९५६ रोजी द्वैभाषिक राज्य अस्तित्वात आले होते. त्यावेळी महाराष्ट्रास मध्य प्रांतातून विदर्भ व हैद्राबाद राज्यातून मराठवाडा हे जोडले गेले आणि दक्षिण महाराष्ट्रातील बेळगांव, धारवाड, कारवार व कानरा हे चार जिल्हे म्हैसूर राज्यास (आताचे कर्नाटक) जोडले गेले. १९६० मध्ये आजचे महाराष्ट्र राज्य स्थापन होत असताना कच्छ, सौराष्ट्र, गुजरात अलग होऊन त्यांचे गुजरात हे स्वतंत्र राज्य बनले. पण बेळगाव-कारवार हे बहुसंख्य मराठी भाषिक विभाग कर्नाटकातच राहिले. हे भाग महाराष्ट्रात यावे म्हणून पस्तीस वर्षांहून अधिक काळ अखंड सीमा लढा चालू आहे. त्याची सोडवणूक अजूनही दृष्टीपथात नाही. आजच्या महाराष्ट्रात पश्चिम किनारपट्टी, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ असे भाग येतात. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आणि नागपूर उपराजधानी आहे. [९]

महाराष्ट्र राज्यात एकूण ३१ जिल्हे आहेत. ३,०७,६९० चौरस किलो मीटर क्षेत्र आणि १९९१ च्या जनगणनेनुसार ७,८७,०६,७१२ लोकसंख्या

असलेले महाराष्ट्र राज्य भौगोलिक विभागानुसार देशातील चौथ्या क्रमांकाचे आणि लोकसंख्येच्या आधारे तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. १५.८ उत्तर ते २२.१ उत्तर अक्षांश आणि ७२.६ पूर्व ते ८०.९ पूर्व रेखांश या क्षेत्रात महाराष्ट्र व्यापलेला आहे. महाराष्ट्राच्या पश्चिमेस अरबी समुद्राचा ७२० कि.मी. लांबीचा किनारा लाभला आहे. महाराष्ट्रात एकूण ३०५ तालुके आहेत. १०

## यशवंतराव चव्हाणांची कृषी औद्योगिक समाजाची संकल्पना :

महाराष्ट्र राज्य निर्माण झाले आणि महाराष्ट्रीय जनता नव्या उमेदीने नवसमाज निर्माण कार्याला लागली. महाराष्ट्राचे तत्कालीन सत्ताधारी पक्षाचे नेते व नवराज्याचे पहिले मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्याला नवा आकार नवा आशय प्राप्त करून देण्याचा प्रयत्न सुरु झाला. त्यासाठी श्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेने कृषी औद्योगिक समाजनिर्मितीचा प्रयोग कार्यान्वित करण्यात आला. मराठी जनतेच्या सर्वांगिण विकासाच्या साऱ्या शक्ती मुक्त होतील. जनतेचे समाज परिवर्तनाचे सामर्थ्य वाढेल आणि समतेचा व समृध्दतेचा गतिमान समाज अस्तित्वात येईल या आशावादाने महाराष्ट्र राज्याची वाटचाल सुरु झाली. महाराष्ट्रीय समाज हा भारतीय समाजाप्रमाणेच शेतीप्रधान समाज आहे. त्यामुळे बहुसंख्य मराठी जनता ग्रामीण भागात शेतीमध्ये गुंतलेली आहे. शेतीचा म्हणजे बहुसंख्य ग्रामीण जनतेचा, विस्तृत ग्रामीण विभागाचा विकास झाल्याशिवाय महाराष्ट्रीय जीवनाच्या परिवर्तनाची प्रक्रिया जोमदार व गतीमान बनणार नाही. यासाठी ग्रामीण व शहरी विभागाचा औद्योगिक विकास होणे आवश्यक आहे. या आधुनिक शेती व औद्योगिक विकासात विज्ञान व तंत्रज्ञानाचा स्वीकारही अपरिहार्य आहे.

नव्या ज्ञान विज्ञान तंत्रज्ञानाचा स्वीकार, वापर व प्रसार शिक्षणातून होऊ शकतो. त्यासाठी सर्व प्रकारचे शिक्षण जनतेपर्यंत पोचविणे गरजेचे ठरते. समाजाचे विकसन कृषी औद्योगिक समाजात होण्यासाठी सहकाराचे माध्यम योग्य व प्रभावी ठरेल. यासाठी सहकारी चळवळीला प्रोत्साहन देणे, तिची शहरी व विशेषत: ग्रामीण भागात विविधांगी वाढ करणे जरूरीचे आहे. शेती, उद्योग विकासाला आवश्यक भांडवल पुरवठा, शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या मालाची व शेतकऱ्याला उत्पादनासाठी लागणाऱ्या अन्य वस्तूंची खरेदी-विक्री शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचे उत्पादक शेतकऱ्यांकडून संघटन व संकलन इत्यादी बाबी सहकारी तत्वावर कार्यान्वित करण्याला चालना देणे आवश्यक ठरते. शहरी विभागातही औद्योगिकरणाच्या विकासासाठी बँका, औद्योगिक वसाहती, विविध अर्थसंस्था व विकाससंस्था यांच्यामार्फत अनेकविध साहाय्य देऊन राज्यातील एकूण विकास शक्तींना कार्यशील करणे आवश्यकचे ठरते. या विकास प्रक्रियेत विविध स्थानिक पातळीवर जनतेचा सहभाग असल्याखेरीज विकास प्रक्रिया गतिमान होऊ शकणार नाही. यासाठी स्थानिक पातळीवरील विकास कार्यांच्या निर्णयात व अंमलबजावणीत स्थानिक जनतेला सहभागी करणे अटळ ठरते. म्हणून विकेंद्रीत लोकशाहीच्या पंचायत राज्याच्या योगाने ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यासारख्या ग्रामीण विभागातील व नगरपालिका, महानगरपालिका यासारख्या शहरी विभागातील स्थानिक शासनसंस्थांची पुनर्रचनाही झाली पाहिजे. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर कृषी-औद्योगिक समाजाच्या निर्मितीच्या या वैचारिक प्रेरणा होत्या. [११]

यशवंतराव चव्हाण यांना व पर्यायाने शासनाला अभिप्रेत असलेली कृषी-औद्योगिक समाजव्यवस्था संकल्पना पुढीलप्रमाणे व्यक्त करता येईल.

१) आर्थिक विकासासाठी शेती व उद्योग यांच्या विकासाला समान महत्व देणारे धोरण शासनाला आवश्यक वाटत होते. कृषी व उद्योगधंदे यांच्या संतुलित विकासाचे उद्दिष्ट महाराष्ट्र शासनाने स्वीकारले होते. फक्त औद्योगिक विकासाने आर्थिक विकास होऊ शकतो ही भूमिका अमान्य होती.

२) कृषी - औद्योगिक विकासासाठी शासनाने कृषी क्षेत्रातील उत्पादकता वाढविणे, कृषी मालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे ग्रामीण भागात काढणे हा मार्ग स्वीकारावा असे ठरविले होते. कारण औद्योगिक विकासाची प्रक्रिया ग्रामीण जीवनाशी एकजीव करणे आवश्यक होते.

३) कृषी मालावर औद्योगिक प्रक्रिया करणारे उद्योगधंदे सहकारी क्षेत्रात असावेत व लघुउद्योगांना प्रोत्साहन द्यावे असेही धोरण होते. त्यात भांडवलशाही स्वरूपाच्या निव्वळ औद्योगिकरणातून निर्माण होणारी मक्तेदारी व विषमता टाळता येईल असे अभिप्रेत असावे.

४) कृषी क्षेत्राचे आधुनिकीकरण करण्यासाठी ग्रामीण विद्युतीकरण अत्यावश्यक आहे.

५) ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाशिवाय ख-या अर्थाने सर्वंकष आर्थिक प्रगती शक्य नाही असा शासनाचा ठाम विश्वास होता. [१२]

**महाराष्ट्राचा औद्योगिक विकास :**

१९६० साली एकूण औद्योगिक उत्पादनात उपभोग्य वस्तूंचे प्रमाण अधिक होते. १९८४ च्या सुमारास भांडवली वस्तूंचे उत्पादन (यंत्रे, अवजारे, पेट्रोलियम उत्पादने, परिवहन सामग्री) प्रमाण वाढले. त्यामुळे औद्योगिक

संरचना बदलली. शहरीकरण, उत्पादन वाढ, विजेचा वापर, उत्पादन संरचनेतील बदल, मूलभूत सुविधांची उपलब्धता, भांडवल गुंतवणूक, कर्जपुरवठा, औद्योगिक आकृतीबंधाचे विकसन, रोजगार निर्मिती अशा औद्योगिक विकासात महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीने मोठी झेप घेतली आहे. या औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेत खाजगी क्षेत्रातील मोठया उद्योगसमूहांचे स्थान महत्वाचे आहे. मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राला वाव असल्याने औद्योगिक प्रगतीसाठी चालना देण्यात आली. सार्वजनिक क्षेत्रात उद्योगांचे प्रवर्तन, विकास, अर्थपुरवठा, विकेंद्रीकरण, वाहतूक सोयी अशासाठी महाराष्ट्र राज्याने अनेक व्यवसाय सुरु केले.

ग्रामीण व शहरी विभागातील औद्योगिक विकासाचा वेग वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला. एकूण औद्योगिक विकासाचा एक मोठा प्रवाह ग्रामीण भागाच्या शेती व उद्योगाशी सलग्न करण्याच्या राज्यशासनाच्या धोरणामुळे कृषी औद्योगिक समाजाला आकार देण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले. त्यामुळे राज्याच्या आर्थिक विकासाचे स्वरूप पालटले. आर्थिक विकासातील शेतीविषयक, औद्योगिक, व्यापार, भांडवल व संयोजन विषयक जे केंद्रीकरण झाले होते ते बदलू लागले. या विकासशक्तीचा स्पर्श व्यापक झाला. जे प्रदेश, जे गट, ज्या विकासशक्ती आतापर्यंत विकास प्रवाहात समाविष्ठ होऊ शकत नव्हत्या अशा प्रदेशात व्यक्तीगटात विकासाचे, नवचैतन्याचे वारे वाहू लागले. उन्नतीची व उत्कर्षाची एक नवी उर्मी निर्माण झाली. [१३]

## सहकार, स्थानिक शासन व पंचायत राज्य याद्वारे औद्योगिक विकास

कृषी औद्योगिक समाज उभारणीचे सहकार, स्थानिक शासन व शिक्षण महत्वाचे आधार होत. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण

जीवनाचे संपूर्ण परिवर्तन व्हावे या विचाराने राज्य शासनाने सहकारी चळवळीला चालना दिली. महाराष्ट्र राज्याने अन्य घटक राज्यापेक्षा सहकाराच्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे.

कृषी-औद्योगिक विकासाला आवश्यक असणारा पतपुरवठा करण्यासाठी प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था, मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी बँका, शहरी विभागात उद्योग व व्यापार यासाठी पतपुरवठा करण्यासाठी नागरी सहकारी बँका यांचा विकास मोठ्या प्रमाणावर होत आहे. तसेच शेतीमालास किफायतशीर भाव मिळावेत, शेतकऱ्यांचे शोषण होऊ नये म्हणून सहकारी विपणन संस्था, नियंत्रित बाजारपेठा यांना कार्यप्रवण करण्यात आले. शेती, उद्योग व्यापार व संयोजन या क्षेत्रात सहकारी चळवळीने ग्रामीण समाजाच्या आर्थिक पुरुषार्थाचा एक नवा चमत्कार घडविला आहे. यातून निर्माण झालेल्या नेतृत्वाचा फार मोठा प्रभाव राज्याच्या राजकीय व प्रशासकीय जीवनावर आहे.

कृषी-औद्योगिक समाजात केवळ आर्थिक शक्तींचे वा अर्थसत्तेचे विकेंद्रीकरण अभिप्रेत नाही, तर राजकीय व प्रशासकीय सत्तेचे विकेंद्रीकरण अपेक्षित आहे. स्थानिक पातळीवरील लोकांचा विकास प्रक्रियेसंबंधी निर्णयात व कार्यवाहीत सहभाग असेल तरच ती प्रक्रिया वेगवान व अर्थपूर्ण होऊ शकेल. १९६२ पासून महाराष्ट्र राज्यात विकेंद्रीत लोकशाहीच्या पंचायत राज्याच्या प्रयोगाला प्रत्यक्ष सुरुवात झाली. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका या स्थानिक शासनाना अधिक वाव व अधिकार देण्यात

आले. महाराष्ट्र राज्यातील स्थानिक शासन देशातील अन्य घटक राज्यातील स्थानिक शासनापेक्षा अधिक कार्यक्षम व यशस्वी आहे. पंचायत राज्याने स्थानिक नेतृत्वाच्या विकासाच्या कक्षा व सामर्थ्य वाढविले आहे. [१४]

## लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग

कृषी-औद्योगिक समाजरचना अर्थपूर्ण होण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांना विकासाची नेमकी कोणती प्रक्रिया पाहिजे हे योग्य पद्धतीने ठरवायचे झाल्यास राज्याचे धोरण व त्याची कार्यवाही या प्रक्रियेत म्हणजेच एकूण प्रशासन व्यवस्थेत स्थानिक पातळीपासून ग्रामीण मतप्रदर्शनास परिणामकारक पद्धतीने सहभाग मिळाला पाहिजे हे लक्षात घेऊन १९६२ पासूनच ग्रामपंचायत, तालुका पंचायत व जिल्हा परिषदाची लोकनियुक्त व्यवस्था राबविण्याचा प्रयत्न महाराष्ट्र राज्याने सुरु केला. लोकशाही विकेंद्रीकरणाचा हा प्रयोग इतर कोणत्याही राज्यापेक्षा अधिक प्रमाणात आपल्या राज्यात यशस्वी झाला आहे. [१४]

लोकशाही विकेंद्रीकरणाच्या संदर्भात नाईक समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्यात पंचायत राज्याची सुरवात झाली. ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय रचना कार्यान्वित झाली. १९६२ ते १९७४ पर्यंत महाराष्ट्रातील पंचायत राज्याने चांगले कार्य केले. ग्रामीण विकासाला चालना देणारे हे पुरोगामी राज्य म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख केला जातो. पण या पुरोगामी राज्यातही राज्य-सरकारचा हस्तक्षेप, नियमित निवडणुका न होणे, पंचायत राज्यबाह्य

संस्थांची निर्मिती, खासदार-आमदार यांचे वाढते महत्व, यामुळे पंचायत राज्यसंस्थाना गौणत्व, दुय्यम दर्जा प्राप्त होऊ लागला. पंचायत राज्याचा आढावा घेण्यासाठी १९७१-७२ मध्ये बोंगिरवार समिती नियुक्त केली, या समितीने काही चांगल्या सूचना केल्या. त्यानंतर १९८४ साली पी.बी. पाटील समिती नेमली. पाटील समितीने महाराष्ट्रातील पंचायत राज्यपध्दतीच्या स्वरूपाचा व सुधारणांचा व्यापक व सखोल अभ्यास केला व १९८६ साली आपला अहवाल सादर केला. [१६]

## महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्व

१९५६ मध्ये जे विशाल द्वैभाषिक राज्य निर्माण झाले त्याचे यशवंतराव चव्हाण हे मुख्यमंत्री झाले. १९६० सालापर्यंत यशवंतरावांनी बहुतेक मराठी भाषिक विभागात आपल्या पुढारीपणाचा जम बसविला. १९६२ साली सीमावादातून चीनशी युध्द सुरु झाले. परिणामी झालेल्या कोलाहलात कृष्ण मेनन यांना संरक्षण मंत्रीपदाला मुकावे लागले. दिल्लीतील नेतृत्वाने ती जागा घेण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांना पाचारण केले. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांच्या जागी मुख्यमंत्री म्हणून विदर्भातील मारोतराव कन्नमवार यांची निवड झाली. त्यांच्या अकाली निधनानंतर १९६३ साली वसंतराव नाईक मुख्यमंत्री पदावर विराजमान झाले. ते सुध्दा विदर्भातीलच होते. वसंतराव नाईक हे मराठेतर ब्राह्मणेतर होते. आपल्याला आव्हान देणारे प्रतिस्पर्धी सत्ताकेंद्र मराठा समाजात निर्माण होऊ नये यामध्ये यशवंतराव चव्हाणांचे धोरण असे, त्यावेळी कित्येक गोटात म्हटले गेले. फिरत्या मुख्यमंत्री पदाच्या संकेताला डावलून वसंतराव नाईक तब्बल बारा वर्षे, १९७५ पर्यंत मुख्यमंत्री म्हणून राहिले.

मुख्यमंत्री पदावर आल्यानंतर वसंतराव नाईक यांनी केवळ विदर्भातीलच नव्हे तर अखिल महाराष्ट्र राज्यात स्वत:ची प्रभावळ निर्माण केली. आपला राजकीय पाया भक्कम केला. तसेच पुढे वसंतराव नाईकांनी थेट इंदिरा गांधीशी जवळीक साधण्यात यश मिळविले. देशाच्या विविध प्रदेशात स्वत:च्या ताकदीवर उभ्या असलेल्या नेतृत्वाऐवजी तुलनेने कमी ताकदीचे पण आपल्या पंखाखाली असलेले नेतृत्व सत्तापदावर असावे असे इंदिरा गांधीचे राजकीय धोरण होते असे म्हटले जाते. पश्चिम महाराष्ट्र आणि विशेषत: मराठवाडा येथील कार्यकर्त्यांना वसंतराव नाईकांचे मुख्यमंत्रीपद बोचू लागले होते. तसेच इंदिरा गांधीनाही नाईकांना बदलावयाचे होते. परिणामी मुख्यमंत्रीपदात खांदेपालट झाला. आणि वसंतराव नाईकांच्या जागी मराठवाड्यातील शंकरराव चव्हाण यांची मुख्यमंत्रीपदावर निवड झाली. आणीबाणीच्या काळात शंकरराव चव्हाण हेच आणीबाणीचे महाराष्ट्रातील मुख्य समर्थक बनले होते. [१७]

## आणीबाणीनंतरचे राजकारण

आणीबाणीचा फटका म्हणून १९७७ साली कॉंग्रेस पक्षाचा केंद्रस्थानी तसेच अनेक राज्यांमध्ये जनतापक्षाकडून जो अभूतपूर्व पराभव झाला त्याची झळ महाराष्ट्रातील कॉंग्रेस पक्षालाही बसली. महाराष्ट्र राज्यातील निवडणुका १९७८ साली झाल्या, तेव्हावेतो कॉंग्रेस दुभंगली होती. इंदिरा गांधीनी स्वत:चा कॉंग्रेस (आय) हा पक्ष स्थापन केला त्यात ४८ पैकी २८ जागा विरोधकांनी जिंकल्या. त्यानंतर शंकरराव चव्हाणांच्या जागी वसंतदादा पाटील मुख्यमंत्री बनले. या निवडणूकीत वसंतदादांच्या कॉंग्रेस (रेड्डी) फक्त ६९ जागा मिळाल्या. कॉंग्रेस (इं) ने संघटनात्मक बल कमी

असूनही विदर्भात आघाडी घेवून ६२ जागा जिंकल्या. काळाची बदलती पावले ओळखून वसंतदादा आणि वसंतराव नाईक यांनी इंदिरा काँग्रेसशी समझोता केला. या निवडणुकीत जनता पक्षाला महाराष्ट्राच्या विधानसभेत तिस-या हिश्श्याहून अधिक जागा मिळाल्या आणि त्यांत जनसंघ, समाजवादी आणि जुने काँग्रेसवाले यांना समान बळ होते. इंदिरा काँग्रेस आणि स्वर्णसिंग काँग्रेस [illegible] यांचे संमिश्र सरकार वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली निर्माण झाले. हे सरकार अल्पकाळ म्हणजे जेमतेम पाच महिने टिकू शकले.

यशवंतराव चव्हाण यांना मानणा-या शरद पवारांनी चार महिन्यातच पलटी घेऊन शरद पवार आणि त्यांच्या पाठीराख्यांनी बंडखोरी करून समांतर काँग्रेसची स्थापना केली. जनता पक्ष आणि शे.का.प. यांच्या सहकार्याने "पुलोद आघाडी" निर्माण करण्यात आली आणि शरद पवार मुख्यमंत्री झाले. शरद पवारांचे मंत्रीमंडळ सुमारे दीड वर्ष टिकले. त्यांना आघाडीचे राजकारण चालविणे भाग होते, पण ते त्यांनी यशवंतरावांच्या शैलीने (आणि त्यांच्या अप्रत्यक्ष आशीर्वादाने) चालविले. पवार मंत्रीमंडळाला वर्ष होते न होते इतक्यात केंद्रीय स्तरावर उलथापालथी झाल्या. जनता पक्षाची शकले उडाली आणि ही संधी साधून इंदिरा गांधींनी तेथील मंत्रीमंडळ उलथविण्यात यश मिळविले. तेव्हा १९८० च्या जानेवारीत संसदेच्या निवडणुका झाल्या. जनता पक्षाला राज्यकारभारातील नाकर्तेपणामुळे फारशी राजकीय पत राहिली नव्हती. इंदिरा काँग्रेसला प्रचंड बहुमताने केंद्रात राजसत्ता मिळाली. यशवंतराव चव्हाण व शरद पवार यांच्या काँग्रेसला फक्त १ जागा मिळाली. इतर सर्व पक्ष संख्याबळाने किंवा राजकीयदृष्टया अप्रभावी, नगण्य बनले. तेव्हा राज्यातील सरकारे पाडून तेथे आपल्या पंखाखालची नवी सरकारे आणणे

ओघानेच आले. त्यानंतर महाराष्ट्रासह अनेक राज्यात मार्च, १९८० मध्ये इंदिरा काँग्रेसची सरकारे सत्तेवर आली. महाराष्ट्रात वसंतदादांची पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदाची संधी हुकली आणि इंदिरा गांधीचे अनुयायी ए.आर. अंतुले हे मुख्यमंत्री झाले. अंतुले यांना आधीच्या मुख्यमंत्र्यासारखा महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागात सामाजिक-राजकीय पाया नव्हता. पण इंदिरा काँग्रेस विधि मंडळ पक्षावर त्यांची पकड होती.

आतापर्यंत महाराष्ट्रात दहा मुख्यमंत्री झाले. त्यातील बाबासाहेब भोसले व शिवाजीराव पाटील-निलंगेकर हे अल्पकाळ राहिले. शरद पवार हे चौथ्यांदा मुख्यमंत्री झाले. वसंतराव नाईक यांची कारकीर्द जवळजवळ बारा वर्षे इतकी झाली. त्यानंतर शरद पवार हे जरी सलग दीर्घकाळ मुख्यमंत्री नसले तरी वसंतराव नाईक यांच्यानंतर शरद पवार हेच सर्वाधिक काळ महाराष्ट्राचे सत्ताधारी राहिले आहेत. शंकरराव चव्हाण यांच्या कारकीर्दीचे दोन भाग पडतात. एक आणीबाणीच्या काळात त्यांची कारकीर्द ही कारकीर्द ७८६ दिवसांची झाली आणि त्यानंतरची एप्रिल,१९८६ ते जून, १९८८ ही दुसरी कारकीर्द झाली. आणीबाणीच्या काळात शंकरराव चव्हाण यांनी जमीन सुधारणेसारखे अनेक बदल घडवून आणले. त्यांच्या दुस-या टर्ममध्ये त्यांनी सहकारी क्षेत्रातील मक्तेदारी मोडण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्रात साखर सम्राट आणि सधन शेतकरी यांच्या लॉबीचा प्रभाव राजकारणावर आहे. शंकरराव चव्हाण यांना या लॉबीचा पाठींबा नाही, पण त्यांना शेतक-यांच्या समस्यांची जाणीव होती आणि म्हणूनच उपलब्ध असलेले पाणी नगदी पिकांना बारमाही देण्याऐवजी आठमाही घावे व राहिलेले पाणी हे आजवर ज्यांना पाटबंधारे योजनांचा फायदा मिळालेला नाही अशा कोरडवाहू शेतक-यांना घावे यासाठी त्यांनी

प्रयत्न केला होता. साखर सम्राट व सधन शेतक-यांच्या विरोधात त्यांनी राजकारण केले. अंतुले यांच्या काळात सिमेंट प्रकरण गाजले, प्रतिष्ठान प्रकरणे गाजली आणि न्यायालयाच्या ठपक्यामुळे त्यांना मुख्यमंत्री पद सोडावे लागले. सर्वात जास्त काळ सलग सत्तेवर राहिलेले वसंतराव नाईक हे महाराष्ट्रातील ऐकमेव मुख्यमंत्री होत. त्यांच्या कारकीर्दीत शेती या विषयाला "राजमान्यता" मिळाली. मंत्रालयाच्या पातळीवर शेतीची चर्चा होऊ लागली. संकरित बियाणे, सुधारित बियाणे, वसंत बंधारे यांचा प्रसार नाईकांच्याच कारकीर्दीत होऊन महाराष्ट्रातील शेती उत्पन्न वाढत चालले.

यशवंतराव चव्हाण यांच्या महाराष्ट्रातील राजकीय वर्चस्वाला १९६९ च्या भारतीय राजकारणातील घटनांमुळे तडा गेला आणि त्यांचे वर्चस्व महाराष्ट्राच्या राजकारणात कमी अधिक होऊ लागले. [१९]

## महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे राजकारण

यशवंतराव चव्हाणांच्यानंतर महाराष्ट्रात जे मुख्यमंत्री झाले व कॉंग्रेस पक्षाचे नेतृत्व करू लागले, त्यांच्या व्यक्तिगत गुणावगुणानुसार व कार्यक्षमतेनुसार कॉंग्रेस पक्षाच्या राजकीय कार्यात चढउतार झाले, तरीदेखील कृषी-औद्योगिक समाजामुळे जो व्यापक पाया लाभला तो १९७५ पर्यंत तरी भक्कम राहिला. १९६७ च्या निवडणुकीत देशातील नऊ राज्यांत कॉंग्रेसला विधानसभातून बहुमत मिळाले नाही. लोकसभेत कॉंग्रेसच्या संख्येत मोठी घट झाली. नऊ राज्यात कॉंग्रेसत्तर सरकारे आली. परंतु महाराष्ट्रात कॉंग्रेसचे बहुमत कायम राहिले व सरकारही टिकून राहिले. १९७१ च्या निवडणुकीत बांगला देशाच्या विजयामुळे सर्व देशभर कॉंग्रेसचे बळ वाटले.

महाराष्ट्रात ते आणखी मजबूत झाले. १९६९ मध्ये काँग्रेस पक्षात जी फूट पडली ती मध्ये महाराष्ट्र काँग्रेसमधील मोठा गट यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली मोरारजी-रेड्डी यांच्या मागे राहिला. परंतु राष्ट्रपतीच्या निवडणुकीत डाव्या पक्षांच्या सहाय्याने इंदिरा गांधीचे उमेदवार व्ही.व्ही. गिरी विजयी झाल्याने महाराष्ट्र काँग्रेसने व यशवंतराव चव्हाणांनी पुन्हा इंदिरा गांधींना पाठिंबा दिला व केंद्रातील आपले स्थान टिकवून धरले.

केंद्रीय काँग्रेस पक्ष व केंद्रीय सरकार यामध्ये इंदिरा गांधीचे नेतृत्व प्रस्थापित झाल्यापासून काँग्रेस पक्षात जी फूट पडली तीमुळे महाराष्ट्र काँग्रेसमध्ये सकृतदर्शनी फूट पडली नाही, तरी अंतर्गत गटबाजीने मूळ धरले आणि खास करून यशवंतराव चव्हाणांच्या स्थानाला आव्हान देणाऱ्या शक्तींची काँग्रेस पक्षात वाढ करण्याचे प्रयत्न सुरू झाले व त्यांना इंदिरा गांधीकडून प्रोत्साहन मिळत राहिले. १९७५ पासून आणीबाणीच्या काळापासून या प्रक्रियेला वेग आला आणि १९७७ च्या निवडणुकीत त्याचे परिणाम दिसून आले. काँग्रेस पक्षाला लोकसभेतील अनेक जागा गमवाव्या लागल्या आणि १९७८ मधील विधानसभेत काँग्रेस (रेड्डी) पराभूत झाली. इंदिरा गांधीनी काँग्रेस बाहेर पडून आपली वेगळी काँग्रेस सुरु केली. महाराष्ट्रात चव्हाणांची काँग्रेस व इंदिरा काँग्रेस यांना बरोबरीने जागा मिळाल्या. दोघांचे संयुक्त सरकार बनले, पण ते फार काळ टिकू शकले नाही. यशवंतराव चव्हाणांच्या मार्गदर्शनाखाली शरद पवारांचा गट काँग्रेस बाहेर पडला व त्याने वसंतदादा पाटील यांचे संयुक्त सरकार पाडण्यासाठी जनता व इतर विरोधी पक्षांशी युती केली. वसंतदादांचे सरकार पडले आणि शरद पवारांच्या नेतृत्वाखाली पुरोगामी लोकशाही दल या आघाडीचे सरकार सत्तेवर आले. त्यावेळी केंद्रात जनता पक्षाचे सरकार

होते, पण त्यात तेथे फूट पडली. चरणसिंग-चव्हाण युतीचे सरकार इंदिरा काँग्रेसच्या पाठिंब्यावर केंद्रात सत्तेवर आले, पण ते अगदीच बिनआधारी. इंदिरा गांधींनी योग्यवेळी आपला पाठिंबा काढून घेतला.

१९८० मध्ये पुन्हा निवडणुका झाल्या. इंदिरा काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळाले. त्या पुन्हा पंतप्रधान झाल्या. महाराष्ट्रात पुन्हा निवडणूक झाली, तीतही इंदिरा काँग्रेस विजयी झाली आणि बॅ. अ.रा. अंतुले मुख्यमंत्रीपदी दिल्लीहून पाठविण्यात आले. गेल्या ३५ वर्षांत महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट केवळ एकदाच १९८० साली लादण्यात आली होती. १९७८ ते १९८० हा कालखंड वगळता महाराष्ट्रात राजकीय स्थैर्य असल्याचे निदर्शक आहे. १९७८ प्रमाणेच १९९० च्या विधानसभा निवडणुकीत कोणाही पक्षास स्पष्ट बहुमत मिळाले नाही. काँग्रेस पक्षाला २८८ पैकी १४१ जागा मिळाल्या. ११ अपक्षांच्या पाठिंब्याने शरद पवार यांनी मंत्रीमंडळ स्थापन केले. काँग्रेस पक्षाची आजवरची कार्यपध्दती, अंतर्गत लोकशाही व परंपरा या साऱ्यानाच शह बसला. अर्थात पक्षाच्या संघटनात्मक पायावर आणि लोकजीवनातील प्रभावावर विपरीत परिणाम झाला. कृषी-औद्योगिक समाजातून सुरु झालेली विकास प्रक्रिया व पंचायत राज्यातून सुरु झालेली लोकशाही पध्दती या दोन्हीही बाबी कुंठीत झाल्या.[२०]

## महाराष्ट्रातील ग्रामीण विकास

महाराष्ट्रातील ग्रामीण आर्थिक विकासात सहकारी सोसायट्यांनी बजावलेल्या भूमिकेचा महाराष्ट्राच्या राजकारणावर दूरगामी परिणाम झाला आहे. शेती व शेतीवर आधारलेले साखर कारखान्यांसारखे उद्योग

यांच्या सहकारी सोसायट्यांना सरकारकडून सढळ हाताने पैसा पुरविला जातो. तसेच त्याचेद्वारा खते, बी-बीयाणे, पाटबंधाऱ्याचे पाणी वगैरे सवलतीच्या दराने पुरविण्यात येतात. सहकारी चळवळ महाराष्ट्रात यशस्वी झाली असे पूर्वी म्हटले जाई. ते अशा अर्थाने की त्यामुळे ग्रामीण विभागात नगदी पिकांवर आधारित अशा अर्थरचनेचे तिने संगोपन केले आणि सधन शेतकऱ्यांचा वर्ग जोपासला. अशारीतीने सहकारी चळवळीमुळे काँग्रेस पक्षाला भक्कम राजकीय आधार मिळाला. पण पुढे पुढे हे धोरण अडचणीत आले, प्रचंड थकबाकी साचू लागली आणि जाणूनबूजून लांडीलबाडी व गैरकारभार यांनी सहकारी चळवळीला ग्रासले. या चळवळीचे दुसरे अपयश असे की शेतीमालाचे विक्रीचे व्यवहार तिच्या कक्षेत फारसे कधीच आले नाहीत. यामुळे कर्जवसुली करणे कठीण बनले.

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने यशस्वी ठरले याची मुख्य दोन कारणे आहेत. साखरेचा अधिक अंश असलेल्या ऊसाचे अधिक उत्पादन होण्यास अनुकूल अशी शेतजमीन आणि नफा मिळू शकेल अशा तऱ्हेचे नियंत्रित भाव. यामुळे सभासद शेतकऱ्याला ऊसाला उत्तम भावही मिळतो आणि कारखान्याच्या नफ्यात वाटाही मिळतो. पण साखर कारखान्यातील कामगारांना मिळणारी वागणूक आणि सामान्य ग्राहकाला साखरेसाठी मोजावी लागणारी किंमत यादृष्टीने विचार केला तर या उद्योगांना आदर्श सहकारी उद्योग म्हणता येणे कठीण आहे.

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती इत्यादीद्वारा सत्तेचे विकेंद्रीकरण केल्यामुळे या ग्रामीण आर्थिक विकासाला मोठी मदतच झाली. ही राजकीय सत्तास्थाने आणि सहकारी बँका, भूविकास बँका,

सहकारी सोसायट्या इत्यादी आर्थिक सत्तास्थाने ही परस्परांना पूरक आणि समांतर आहेत. या स्थानावर बसून नवोदित ग्रामीण सत्ताधारी वर्ग तालुका आणि जिल्हा स्तरावर आणि तेथून राज्यस्तरावर राजकीय प्रभुत्व गाजवितो. या कामी त्याला या सहकारी साखर संस्थानांचाही वापर करता येतो. सहकारी चळवळ आणि सत्तेचे विकेंद्रीकरण महाराष्ट्रात यशस्वी झाले याचा खरा अर्थ हा असा आहे. [२१]

महाराष्ट्राचा पिंड राजकीय आहे असे म्हटले जाते म्हणजे काय ? त्याच्या पाठीमागे कोणती कारणे दडलेली आहेत ? महाराष्ट्रावर निसर्गाने विशेष मेहेरनजर केलेली नाही. महाराष्ट्रातील निम्मे जिल्हे मागासलेले मानले जातात. ५४ टक्के भूप्रदेश आणि ४३ टक्के लोकसंख्या मागासलेली आणि दरिद्री आहे. जमिनीची उत्पादनक्षमता कमी आहे. एकूण पिकाखालील जवळ जवळ तिसरा भाग अवर्षण प्रवणग्रस्त क्षेत्र आहे. या भागात पाऊस अतिशय कमी व अनियमित पडतो. त्यामुळे महाराष्ट्राच्या ३०५ तालुक्यापैकी १९२ तालुके सततचे मागासलेले राहिले आहेत. त्यामुळे अनियमित पाऊस, दुष्काळ व त्याविरुध्द उपाययोजना या चक्रामध्ये ग्रामीण विभाग अडकलेला, गुंतलेला दिसतो. अनियमित पाऊस व त्याविरुध्द उपाययोजना हेच रहाटगाडगे चालू आहे. १५ व्या शतकात बहामनी राज्याच्या काळात त्यावेळच्या सुलतान अहमदने १० हजार बैलगाडया धान्य गुजरात आणि माळवा येथून आणले होते. पेशव्यानी १८०२ साली धान्य आयात केले होते व जमीन महसुलात सूट दिली होती, ते आजच्या सरकारच्या धान्य आयात व टँकरने पाणी- पुरवठा करण्यापर्यंतचे सर्व कार्यक्रम ग्रामीण विकासाच्या रहाटगाडयाशी जोडलेले आहेत.

अशा या हलाखीच्या परिस्थितीमुळे काबाडकष्ट जिणे जगण्याची ताकद महाराष्ट्राने कमावली. या परिस्थितीचा परिणाम म्हणून

महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक जनसमूहांचे लढे उभे राहिलेले दिसतात. शेतीवर अवलंबून असणाऱ्या ह्या समाजाने शासनाच्या महसूल वसूली इतर अटींनी हैराण होऊन उठावाच्या आंदोलनाद्वारे आपला राग व्यक्त केलेला आहे. इ.सन १८२६ व सन १८४४ मधील रामोश्यांचे उठाव, सन १८३० ते १८४६ मधील कोळ्यांचे उठाव, सन १८७५ मधील कर्जबाजारी शेतकऱ्यांचे महाराष्ट्रव्यापी दंगे आणि १८५७ मधील बंड ही याचीच उदाहरणे होत.

आजही ग्रामीण परिसरामध्ये असंतोष निर्माण होऊ लागला आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्याची प्रखरता अजून कमी झालेली नाही. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत महाराष्ट्रीय शेतकऱ्याला आपले कृषी उत्पादन करण्याची पाळी आली आहे. शेतकरी मोठया संख्येने कर्जबाजारी व थकबाकीच्या चक्रामध्ये अडकलेला दिसतो. गावागावातून बेकार तरूणांच्या फौजा वाढत आहेत. रोजगारासाठी शहराकडे जाणाऱ्यांची संख्या दुर्लक्षणीय नाही. सामाजिक पातळीवर जातीयवादी प्रवृत्ती वाढत आहे. अंधश्रध्दा, बुवाबाजी यांचे स्तोम वाढलेले आहे. राजकीय क्षेत्रात अविश्वास, भ्रष्टाचार, स्वार्थ यांनी सर्वच क्षेत्रे पोखरलेली आहेत. विकासाच्या पातळीवर असे चित्र पाहून एस्.एम्. जोशींसारखे नेते म्हणतात की, माझे या राज्याबद्दल स्वप्न साकार झालेले नाही. जसे देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेले अनेक स्वातंत्र्य सैनिक आज स्वातंत्र्यास ४८ वर्षे होताना म्हणतात की, हेच का स्वातंत्र्य ? अगदी त्याचप्रमाणे.

महाराष्ट्रामध्ये राजकारण करणारा, सत्ता हातात ठेवणारा असा एक वर्ग या आर्थिक-सामाजिक प्रक्रियेतून पुढे आलेला आहे. आणि

याच वर्गाकडून आपल्याच पोळीवर जास्तीतजास्त तूप ओढण्यासाठी राजकीय सत्तेचा वापर करण्यात येऊ लागला आहे. स्थानिक पातळीवर आपले अधिपत्य प्रस्थापित करून राष्ट्रीय पातळीवर केंद्रीय नेतृत्वाबरोबर व्यवहार करण्याची धडपड हा वर्ग करीत आहे. [२२]

महाराष्ट्रातील या राजकारणाचा प्रभाव स्थानिक पातळीवरही पडला. कोल्हापूर जिल्हयाच्या राजकारणातही हे बदल अभिव्यक्त झाले. त्याचप्रमाणे ते गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणातही दृष्टोत्पत्तीस येतात.

## कोल्हापूर जिल्हयातील राजकारण

कोल्हापूर संस्थानात प्रजापरिषदेची स्थापना करण्यापूर्वी १९३१ मध्ये करवीर काँग्रेसची स्थापना करण्यात आली होती. या संघटनेचे अध्यक्षपद हे भाई माधवराव बागल यांच्याकडे होते. परंतु संस्थानात काँग्रेसची चळवळ करण्यास महात्मा गांधींनी अनुमती नाकारल्यामुळे माधवराव बागलानी अध्यक्षपद १९३९ मध्ये वीरमाने यांच्याकडे दिले. जनतेच्या प्रश्नावर संघटितपणे लढा देण्यासाठी संस्थानात "प्रजापरिषद" स्थापन करण्याचा निर्णय घेतला व १९३८ साली प्रजापरिषदेची स्थापना होऊन तिच्या कार्याला मोठया प्रमाणावर सुरवात झाली. यात माधवराव बागलाबरोबर रत्नाप्पा कुंभार ही होते. कोल्हापूर संस्थानातील राजकीय विकासाच्या प्रक्रियेत १९३९ ते १९४९ या काळात प्रजापरिषद या संघटनेचा फार मोठा वाटा आहे. कारण संस्थानात "जबाबदार शासनपध्दती"ची मागणी सातत्याने करून या संघटनेने जनतेत जागृती निर्माण करण्याचा व लोकशाही मूल्ये जीवनप्रणाली म्हणून स्वीकारण्याचा आग्रह सातत्याने धरला.

संस्थानातील लढयाबरोबर राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहात समरस होण्याचा प्रयत्नही या नेतृत्वाने केले. गांधीवादी व मार्क्सवादी विचारांचा पगडा भाई माधवराव बागलांच्या विचारातील कल्याणकारी राज्याची कल्पना या संस्थानात यात अभिप्रेत होती. या संस्थानात प्रजापरिषदेच्या चळवळी-मुळे बहुजन समाजातील नवे नेतृत्व उभे राहू शकले.

सन १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९३८ ला स्थापन झालेली प्रजा परिषदेचे १९४८ ला कोल्हापूर जिल्हा काँग्रेस कमिटीत रुपांतर झाले व त्याचे पहिले अध्यक्ष श्री. रत्नाप्पा कुंभार हे झाले. त्यानंतरच्या काळातही काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांचेच वर्चस्व कायम आहे. १९५२ च्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष हा काँग्रेसचा विरोधी पक्ष होता. पण जिल्हा विधानसभा निवडणुकीत बहुतेक ठिकाणी काँग्रेसचाच विजय झाला. १९५२ च्या नंतर शेतकरी कामगार पक्षाचा प्रभाव वाढला. भाई माधवराव बागल व शेतकारी कामगार पक्षाच्या नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मोठया हिरीरीने भाग घेतला. या चळवळीने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला. १९५७ च्या विधानसभा निवडणुकीत संपूर्ण महाराष्ट्र एकीकरण समितीने प्रचंड विजय मिळविला. १९५६ साली यशवंत-राव चव्हाण हे द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी हळूहळू सहकारी साखर कारखाने व इतर सहकारी संस्थांना उत्तेजन दिले. यामुळे १९५५ व १९५९ ला अनुक्रमे पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि. गंगानगर, इचलकरंजी आणि वारणा सहकारी साखर कारखाना, वारणानगर कारखान्याची स्थापना झाली. यातून ग्रामीण भागाच्या विकासाला पर्यायाने हरित क्रांतीला सुरवात झाली. पश्चिम महाराष्ट्रात सहकाराचे जाळे पसरु लागले.

महाराष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतरही कोल्हापूर जिल्हा राजकारणावर काँग्रेसचा प्रभाव होता. त्यावेळी रत्नाप्पा कुंभार गट जिल्हा राजकारणात

प्रभावी होता. कारण ते जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे पहिले अध्यक्ष होते. तसेच पंचगंगा साखर कारखान्याचे अध्यक्ष होते. या कारखान्याच्या माध्यमातून सहकाराचे जाळे पसरविण्यास सुरवात झाली. यामुळे त्यांचे जिल्हा राजकारणात वर्चस्व होते. पण त्यांच्या या वर्चस्वाला शह देण्याचे व आपला गट प्रबळ करण्याचे काम गडहिंग्लजचे पहिले आमदार म.दुं. श्रेष्ठी गटाने सुरु केला होता. त्यामुळे रत्नाप्पा कुंभार आणि म.दुं. श्रेष्ठी गट यांच्यात सत्तास्पर्धा होती.

यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील व वसंतराव नाईक यांचा महाराष्ट्र राजकारणात एक गट होता. तर शंकरराव चव्हाण, राजारामबापू पाटील यांचा विरोधी गट होता. यशवंतराव चव्हाण गटात कोल्हापूर जिल्ह्यातून दत्ताजीराव कदम तर शंकरराव चव्हाण गटात रत्नाप्पा कुंभार व बाबासाहेब खंजीरे काम करीत त्यानंतरच्या काळात कोल्हापूर जिल्ह्यात रत्नाप्पा कुंभार गट आणि खासदार बाळासाहेब माने गट असे दोन प्रबळ गट निर्माण झाले. तालुक्याच्या राजकारणात कार्यरत असणारे गट या गटबाजीशी जोडलेले असतात. कधी कधी ते स्वतंत्रपणे कार्य करतात.

## गडहिंग्लज स्वत:ची अस्मिता जपणारे शहर

कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज हे शहर अनेक कारणांनी महत्वाचे शहर म्हणून गणले जाते. गडहिंग्लज येथे इचलकरंजीसारखी मोठी कारखानदारी नाही किंवा सरकारी उद्योगनगरेही वसविली गेलेली नाहीत हे खरे आहे, आणि तरीही या शहराला आपले एक रुप आहे, स्वत:ची एक

अस्मिता आहे. शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय दृष्टया अतिशय जागृत असलेले हे ठिकाण व्यापाराचे केंद्र म्हणूनही आपली शान राखून आहे. आज या छोटयाशा शहरात वेगवेगळया सामाजिक, शैक्षणिक, राजकीय इ. वेगवेगळया आघाडयांवर प्रत्यही नवनव्या चळवळी उभ्या रहात आहेत. तसेच औद्योगिक दृष्टयाही पुढे येण्याची धडपड चालू आहे. अशी ही जागृत नगरी बनली आहे.

## गडहिंग्लज तालुका भौगोलिक परिस्थिती

कोल्हापूर जिल्हयातील अनेक तालुक्यातील एक तालुका एवढेच गडहिंग्लज नगरीचे रूप नाही, हे आवर्जून सांगितले पाहिजे. गडहिंग्लज शहर हे वि. वृत्तापासून १६.१० उत्तर अक्षांश आणि ७४.२० पूर्व रेखांशावर आहे. ते हिरण्यकेशी नदीच्या डाव्या तीरावर आणि कोल्हापूरच्या अग्नेयेस ७९ कि.मी. वर व घटप्रभा रेल्वे स्टेशनपासून ४९ कि.मी. अंतरावर वसलेले आहे. गडहिंग्लज शहराचे क्षेत्र ३.३८ चौरस कि.मी. आहे आणि गडहिंग्लज तालुक्याचे क्षेत्र १९१.६ चौ.मैल इतके आहे. हे शहर संकेश्वर-गडहिंग्लज-आजरा रस्ता, कडगांव रस्ता व गडहिंग्लज महागांव रस्ता या तीन महत्वाच्या मार्गांनी जोडलेले शहर आहे. आजरा - संकेश्वर रस्त्याला जोडणारी ही नगरी पूर्वीच्या भाषेत सांगावयाचे झाले तर पारपोली - संकेश्वर रस्त्यावरील ही नगरी आहे. पण एवढया परिचयाने हे ठिकाण नाही ओळखता येणार. गडहिंग्लज नगरी ही तालुक्याचे, संस्थान काळातील शब्द वापरायचा झाला तर पेटयाचे ठिकाण. सन १८९० साली प्रकाशित झालेल्या गॅझेटियर प्रमाणे कोल्हापूर "प्रांता"चे एकूण दहा पेठे होते. गडहिंग्लज हा त्यापैकी एक, त्यावेळी गडहिंग्लज पेठयात कटकोळ महाल जोडलेला होता. आज या महालातील बहुतेक भाग कर्नाटकात समाविष्ठ झालेला आहे.

सामान्यपणे गडहिंग्लज तालुक्याची आणि शहराची हवा उष्ण आहे. डिसेंबर ते फेब्रुवारी मध्यापर्यंत हवा थंड असते आणि मे-जून हवा उष्ण असते. बाकीचा काल मान्सूनमध्ये मोडतो. जून ते सप्टेंबर हा पर्जन्यमानाचा कालावधी होय. सरासरी पर्जन्यमान ९०० मि.मी. आहे. हवामानात फार मोठे बदल होत नाहीत. मे महिना सर्वात उष्ण महिना असून उष्णतामान ३१.७ से. व माहे डिसेंबर सर्वात जास्त थंडीचा महिना असून उष्णतामान १९.० से. असते.

सन १९९१ च्या जनगणनेप्रमाणे गडहिंग्लज तालुक्याची एकूण लोकसंख्या १ लाख ७४ हजार ४६४ इतकी असून त्यापैकी पुरुषांची संख्या ८५,५८४ इतकी आणि स्त्रियांची संख्या ८८,८८० इतकी आहे. गडहिंग्लज शहराची लोकसंख्या २२,११० इतकी आहे.[२४] गडहिंग्लज तालुक्यामध्ये गडहिंग्लज हे एकच मुख्य शहर असून तालुक्यातील एकूण गांवाची संख्या ९२ इतकी आहे. गडहिंग्लज तालुक्यात ८९ ग्रामपंचायती आहेत.[२५]

## गडहिंग्लज : थोडासा इतिहासातील शोध

गडहिंग्लज शहराच्या पश्चिमेस हिरण्यकेशी नदी वाहते. उत्तरेस काळभैरीचे जागृत देवस्थान आहे. तर पूर्वेस संकेश्वरकडे व पश्चिमेस आजऱ्याकडे जाणारा रस्ता आहे. कोल्हापूर - बेळगांव "हायवे"वर संकेश्वर लागते. संकेश्वरपासून पश्चिमेला १५ कि.मी. अंतरावर गडहिंग्लज ही नगरी आहे. या नगरीच्या आणि विशेषत: तालुक्याच्या सीमा कर्नाटकाशी दोन-तीन बाजूला जोडल्या गेलेल्या आहेत.

गडहिंग्लज शहर आज ज्या ठिकाणी वसलेले आणि विकास पावत आहे. त्या ठिकाणी ते पूर्वी नव्हते. पूर्वी हे शहर वायव्येस

(हाल्लक्ष्मी शेजारी) ४६०० फुटावर ते होते. पण तेथे पाण्याचा तुटवडा पडू लागला म्हणून इ.स. १६०० मध्ये ते नदीकिनारी हलविण्यात आले. अठराव्या शतकाच्या अखेरीस १७७३ ते १८१० या कालावधीत कान्हेरराव पटवर्धन व निपाणीकर देसाईंच्या सामानगडावर वारंवार स्वाऱ्या होऊ लागल्यामुळे या नगरास फार उपद्रव सोसावा लागला. सामानगड हे गडहिंग्लज शहाराच्या दक्षिण - पूर्वेला सहा मैल अंतरावर वसलेले आहे. पूर्वी गडहिंग्लजमध्येही एक किल्ला होता. कापशी घराण्यातील एका पुरुषाने सन १७०० साली तो बांधला होता. गडहिंग्लजमधील जुन्या वसाहतीत खंदकाचा म्हणून एक भाग ओळखला जातो. आज तेथे नगरपरिषदेची कन्या शाळेची भव्य वास्तू उभी आहे. त्याच्या जवळपास हा किल्ला असावा. या पेठ्याचे तालुक्याचे ठिकाण सन १८५४ पर्यंत सामानगडावर तर मुन्सफ कचेरी ५ कि.मी. अंतरावरील कडगांव या ठिकाणी होती. सन १८५४ साली गडहिंग्लज हा पेठा करण्यात आला आणि मामलेदार कचेरी सामानगडावरून गडहिंग्लज येथे आणण्यात आली. सन १८८१ साली मुन्सफ कचेरीही कडगांवहून गडहिंग्लज येथे आणण्यात आली. यानंतर येथे मामलेदार मुन्सफ कचेऱ्या, तसेच दवाखाना आणि धर्मशाळाही (सध्या प्रांत कार्यालय आहे.) बांधण्यात आल्या. हे सर्व बांधकाम सन १८९० पर्यंत पूर्ण करण्यात आले.[२६]

## गडहिंग्लज नावाचे मूळ

मराठ्यांच्या इतिहासात छत्रपतींच्या ज्या रणधुरंदर सेनापतीने आपल्या विलक्षण स्वाभिमानाने पराक्रमाची शर्थ केली आणि आपल्यावरील भीरुतेचा कलंक पुसून महाराष्ट्राचे नाव उज्वल केले त्या वीर प्रतापराव गुर्जरांची समाधी याच तालुक्यात आहे. ती गडहिंग्लजच्या नागरिकांना

आपल्या कर्तव्याची नित्य जाणीव करुन देत असते. गडहिंग्लजच्या दक्षिणेला सहा मैलावर ऐतिहासिक सामानगडचा किल्ला असून या सामानगडावरुनच या गावाचे नामकरण झाले आहे व त्यामुळे येथील नागरिकांच्या भावजीवनात त्याचे मोठे प्रेरणादायी स्थान आहे.

अन्यायाच्या टाचेखाली वसलेला हा सामानगड ज्यावेळी प्रथम जिंकला गेला त्यावेळी "गड जिंकला", "गड जिंकला" अशा हर्षोन्मादाच्या आरोळ्या लोकांनी दिल्या व "गड जिंकला" या शब्दाचा अपभ्रंश होऊन गडाच्या पायथ्याशी वसलेल्या या गावाला "गडहिंग्लज" हे नामाभिधान झाले अशी दप्तरी नोंद आहे.

गडहिंग्लज या नगरीच्या कुळकथेबाबत आणखीही काही आख्यायिका या परिसरात प्रचलित आहेत. येथील एक नागरिक श्री. वीरगौंड पाटील यांच्या मते गडहिंग्लज नगरीची निर्मिती आष्टयाच्या लढाईनंतर, तिचा परिणाम म्हणून झाली. तर प्रा. विठ्ठल बन्ने यांच्या मते या नगरीचा जन्म फार वर्षापूर्वी झाला. (कल्लेश्वर मंदिरातील खांबावरील लेख)

गडहिंग्लज नगरीच्या नावाबाबत अशीही आख्यायिका आहे की चिक्कोडी तालुक्यातील "ईंग्लज" पासून या "ईंग्लज" चे वेगळेपण दाखविण्यासाठी या नगरीचे नांव गडईंग्लज व त्या नगरीचे नाव नाईंग्लज असे पडले. गडईंग्लज हे नांव सामानगड या गडाच्या निकटतेमुळे प्रसिध्द झाले. पूर्वी याचा "ईंग्लज" असाच उल्लेख आहे. गडईंग्लज या नावावरुन गडहिंग्लज असे नांव आले असावे. [२७]

गडहिंग्लज हे नाव हिंग्लजा देवीच्या नावावरून आले आहे. हिंगलजा नावाची प्रसिध्द सप्तदेवतांपैकी एक देवी आहे. तिचा संदर्भ गुहडहिंगलुजा (गुहडाई) असा दाखविता येईल. हिंगलजा ही देवी फार प्रसिध्द असून या देवीची देवालये बलुचिस्तान, मक्रान टेकडया, पर्शियन आखाती किनारा, राजस्थान तसेच कुलाबा जिल्हयात चौल येथे या देवीचे स्थान आहे. भारतात हिचे बरेच भक्त आहेत. ही क्षात्रियांची देवता आहे व तिची मूर्ती अष्टभुजा-देवी सारखी आहे, असे भारतीय संस्कृती कोशात म्हटले आहे. ही हिंगलजा देवी दक्षिणेत गडहिंग्लजपर्यंत येऊन पोहोचली आहे याचे आश्चर्य मेजर ई.डब्ल्यू. वेस्ट या इंग्रज अधिका-याला वाटले व त्याने १८८१ मध्ये दि इंडियन अँटिक्वरी (The Indian Autiquary ) या मासिकाच्या सप्टेंबरच्या अंकात एक लेख लिहून ते आश्चर्य व्यक्त केले. त्या लेखात त्या इंग्रज अधिका-याने गडहिंग्लज येथे हिंगलजा देवीचे देवालय किंवा घुमटी (Shrine) आहे, असे म्हटले आहे. हिंगलजा या नावावरून गडहिंग्लज नांव आले आहे. २८

## व्यापाराची बाजार पेठ

गडहिंग्लज शहरात गूळ, शेंग, मिरची वगैरे मालाची तालुक्यातून व परपेठेतून मोठया प्रमाणात आवक होते. यामुळे मोठे व्यापारी महत्व प्राप्त झाल्याने येथे बाजार आवाराची (मार्केट कमिटी) स्वतंत्र सोय झालेली आहे. येथे गुरांचा बाजारही मोठया प्रमाणात भरतो. तेल गिरण्या, पोहे-कुरमुरे मिल्स, जिनिंग फॅक्टरी मोठया प्रमाणात चालू आहेत. कारखानदारी क्षेत्राची सुरवात होत असून प्लॅस्टिकचा नवीन कारखाना काढून तसेच शहरात व तालुक्यात पावरलुम्स चालू करून औद्योगिक क्षेत्रात पहिले पाऊल टाकलेले आहे.

गडहिंग्लज तालुका सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीमुळे गडहिंग्लज तालुका ऊस उत्पादनातही अग्रेसर आहे, हे सिध्द झाले असून

त्या खालोखाल मिरची, शेंग, गूळ, जोंधळा, भात व तंबाखू ही प्रमुख पिके आहेत.[२९]

<u>सहकारी चळवळ</u>

कोल्हापूर जिल्ह्यात सहकारी चळवळ प्रबळ आहे. कोल्हापूरजिल्ह्यातील प्रत्येक कुटुंब आणि माणूस कोणत्या ना कोणत्या नात्यानी सहकारी चळवळीशी संबंधित आहे. सामाजिक, राजकीय क्रीडा, शिक्षण अशा अनेक क्षेत्रात गडहिंग्लज शहर आणि तालुका संपूर्ण महाराष्ट्रात अग्रेसर आहे. सह्याद्रीच्या पठारावर असलेला हा तालुका सातत्याने नवनवीन प्रयोग करणारा तालुका म्हणून ओळखला जात आहे. हिरण्यकेशी ही या तालुक्याची जीवनदात्री."सहकार" हा इथल्या प्रगतीचा मूलमंत्र आहे. इथला शेतकरी अत्यंत जिद्दी, कष्टाळू, परस्परांच्या अडीअडचणींचा विचार करुन समस्या सोडविण्याचा प्रयत्न इथे सातत्याने केला जातो. कृषी औद्योगिक प्रगतीसाठी इथली सारी मंडळी धडपडताना दिसतात. प्रामुख्याने १९७५ नंतर या तालुक्याने लक्षणीय प्रगती केली आहे.

गडहिंग्लज तालुक्यात एकूण ४८.०९ हेक्टर जमीन लागवडीखाली आहे. त्यातील १०.७९ हेक्टर जमीन ही बागायत आहे. ब-याच ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आहेत. ऐनापूर, भिवको, जरळी, निलजी, हिटणी व नांगनूर येथे हिरण्यकेशी नदीवर व हडलगे येथे घटप्रभा नदीवर कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधले आहेत. त्याचप्रमाणे लघुरसंपू, नरेवाडी, शेंद्री व अर्जुनवाडी येथे पाझार तलाव आहेत. पण एकूण क्षेत्र पाहता केवळ २० टक्के जमीन ओलिताखाली आहे. ८० टक्के जमीन अद्यापही कोरडवाहू आहे. अलीकडेच चित्री धरणाचा प्रश्न सुटला असल्याने भविष्यकाळात हे प्रमाण वाढून शेतीमालाच्या उत्पादनाचे प्रमाण वाढेल, यात शंका नाही.

गडहिंग्लज व्यापारी केंद्र आहे. मिरची, गूळ आणि शेंग यासाठी प्रसिध्द असलेले शहर आता औद्योगिक केंद्र बनू पहात आहे. जुन्या सहकारी संस्था आता विस्तारीकरणात गुंतल्या आहेत तर अनेक नव्या संस्था विविध क्षेत्रात उदयास येत आहेत. शेती, प्रक्रिया, खरेदी-विक्री, वितरण बँकींग, गृहनिर्माण, दुय्यम उद्योग, रेशीम उद्योग, कापड उद्योग, काजू प्रकल्प अशा सर्वच क्षेत्रात संस्था कार्य करतांना दिसतात. हरळीच्या माळावर डौलाने उभा असलेला गडहिंग्लज तालुका सहकारी साखर कारखाना हा गडहिंग्लजच्या सहकारी चळवळीचा मानबिंदू ठरावा. अनंत अडचणीवर मात करीत या कारखान्याची वाटचाल मोठ्या दिमाखाने पुढे चालू आहे. गडहिंग्लजच्या पश्चिमेला प्रा. किसनराव कुराडे यांच्या परिश्रमामुळे सहकारी क्षेत्रातील पहिली सहकारी सूत गिरणी कार्यान्वित होत आहे. रोजगार देण्याची पुरेपूर क्षमता असणाऱ्या या दोन मोठ्या प्रकल्पामुळे गडहिंग्लज तालुक्याचा चेहरामोहरा बदलत चालला आहे. शेतीवर आधारित असणाऱ्या प्रक्रिया संस्था ही आता काळाची गरज बनली आहे. नेमके हे ओळखूनच श्री. शिवाजी खोत यांच्या नेतृत्वाखाली शरद शेतमाल सहकारी प्रक्रिया संस्थाही कार्यान्वित होत आहे.

शेतकरी हाच प्रामुख्याने सहकारी चळवळीचा केंद्रबिंदू आहे. या शेतकऱ्याला सर्वार्थाने सबळ करण्यासाठी तालुक्यातील ७५ वि.का.स. संस्था कार्य करीत असून कर्जाबरोबरच खते, बि-बियाणे, कीटकनाशके औषधे, उपभोग्य वस्तूचा पुरवठा करत आहेत. विकास संस्थांच्या एकूण २६,१२० सभासदापैकी १९,२१९ सभासद हे अल्पभूधारक आहेत. म्हणजेच अल्प भूधारकांच्या आर्थिक विकासासाठी या संस्था कार्य करीत आहेत, असे म्हणता येईल.

ग्रामीण भागाचा विकास हा ग्रामीण उद्योगधंद्याच्या विकासावर अवलंबून असतो. हे लक्षात घेऊन तालुक्यात दोन सूत गिरण्यांची नोंद झाली आहे. त्यातील सहकार महर्षी दत्ताजीराव कदम सहकारी सूत गिरणीच्या

उभारणीचे काम चालू आहे. तीन विणक-यांच्या सहकारी संस्था व दहा औद्योगिक सहकारी संस्था तालुक्यातील उद्योगधंद्याच्या विकासासाठी प्रयत्नशील आहेत. देवदासींच्या आर्थिक विकासासाठी जाणीवपूर्वक कार्य करणारा तालुका म्हणून गडहिंग्लज तालुका ओळखला जातो. आपल्या दोन औद्योगिक सहकारी संस्थांच्या माध्यमातून उपेक्षित स्त्रियांचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न चालू आहे.

गडहिंग्लज तालुका दुग्धव्यवसायातही अग्रेसर आहे. "दुग्ध क्रांती"ची योजना या तालुक्यात यशस्वी झाली आहे. दुग्ध उत्पादनाच्या बाबतीत गडहिंग्लज तालुक्याचा कोल्हापूर जिल्ह्यात दुसरा क्रमांक आहे. तालुक्यात १२३ दुध उत्पादकांच्या सहकारी संस्था असून दररोजचे सरासरी दूध संकलन हे ४१००० लिटर आहे. गडहिंग्लज, आजरा व चंदगड तालुक्यासाठी गडहिंग्लजनजीक जिल्हा दूध संघाने शीतकरण केंद्र उभारले आहे.

शेतक-याबरोबरच लहान व मध्यम व्यापारी आणि उद्योजक यांना अर्थपुरवठा करण्यासाठी तालुक्यातील नागरी सहकारी बँका प्रयत्नशील आहेत. गडहिंग्लज तालुक्याची भांडवली गरज लक्षात घेऊन जिल्हा मध्यवर्ती बँकेने तालुक्यात अकरा ठिकाणी आपल्या शाखा चालू केल्या आहेत. त्याशिवाय १९४९ मध्ये स्थापन झालेली गडहिंग्लज अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक व १९६४ मध्ये स्थापन झालेली शिवाजी सहकारी बँक इथल्या उद्योग व्यवसायासाठी कर्जपुरवठा करीत आहेत. गडहिंग्लज अर्बन बँकेने कौलगे, दुंडगे येथे आपली शाखा उघडली आहे. कोल्हापूरच्या वीरशैव बँकेने आपली शाखा १९५० मध्ये इथे चालू केली आहे. गडहिंग्लज शहराची व तालुक्याची विकासक्षमता लक्षात घेऊन इतर अनेक बँकांनी आपल्या शाखा येथे उघडल्या आहेत. आजरा अर्बन बँक, वडगांव अर्बन बँक, चंदगड अर्बन बँक, जनता सहकारी बँक यांचा उल्लेख करावा लागेल.

सर्वसामान्य व्यक्तींच्या गरजा भागविण्यासाठी पतसंस्थांचे जाळे विणण्याचा जो प्रयत्न झाला त्याचे पडसादही या तालुक्यात उमटले आहेत. तालुक्यात ११५ नागरी सहकारी पतसंस्था असून त्यांची वाटचाल अपेक्षित गतीने चालू आहे. याशिवाय गव्हर्नमेंट सर्व्हिस को-ऑपरेटिव्ह व प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेने आपल्या शाखा इथे उघडल्या आहेत. तालुक्यात एकूण १४ पगारदारांच्या सहकारी संस्था, ८ औद्योगिक सहकारी संस्था, ११ गृहनिर्माण सहकारी संस्था, ग्राहक सहकारी संस्था अशा सुमारे ३६५ संस्था कार्यरत आहेत. पतसंस्थेच्या क्षेत्रात गडहिंग्लज तालुक्यातील महिलांनीही पुढाकार घेतला आहे. तालुक्यात महिला बँकेची स्थापना झाली आहे. तसेच महिलांच्या नागरी पतसंस्था आहेत. महाराष्ट्र शासनाच्या नवीन धोरणानुसार ५५ महिला विकास संस्थांची नोंदणी झाली आहे.

औद्योगिक सहकारी क्षेत्रात मात्र गडहिंग्लज तालुक्यात फारसे आशादायक चित्र पाहावयास मिळत नाही. अपवादात्मक हिरण्यकेशी औद्योगिक सहकारी संस्थेचा उल्लेख करावा लागेल. या संस्थेने हसूरचंपू येथे औद्योगिक वसाहत उभी करण्याचा निर्णय घेतला आहे. तालुक्यात एकूण १७ औद्योगिक सहकारी संस्था कार्य करीत आहेत.

गडहिंग्लज तालुका खरेदी विक्री संघ हा आपल्या विविध विभागामार्फत शेतकऱ्यांना सेवा पुरविण्याचा प्रयत्न करीत आहे. वितरणाच्या क्षेत्रात "यशवंत बझार" व "वारणा बझार" या दोन डिपार्टमेंटल स्टोअर्सचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. या तालुक्याच्या वि.का.स. संस्थानीही आपल्या गावामध्ये ग्राहक विभाग चालू करून ग्राहकांना वाजवी दरात वस्तू उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. शेतकरी, व्यापारी उद्योजक, पगारदार अशा विविध घटकांसाठी कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांची प्रचंड साखळी या तालुक्यात आहे.

या सर्व क्षेत्राबरोबरच तालुक्यात १५ सहकारी पाणीपुरवठा संस्था, १० उपसा जलसिंचन संस्था कार्य करीत आहेत. ८० टक्के जमीन कोरडवाहू असताना खरे तर या उपसा जलसिंचन संस्थांची गरज प्रकर्षाने जाणवते. इथला प्रमुख प्रश्न आहे तो पाणीपुरवठयाचा. ती ही योजना आता मार्गी लागत आहे. या तालुक्याचा भविष्यकाळ सर्वार्थाने उज्ज्वल आहे. त्याची सुचिन्हे दिसत आहेत. चित्री प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर हा तालुका कृषी औद्योगिक क्षेत्राची पंढरी म्हणून नक्की ओळखला जाईल.

गडहिंग्लज तालुक्याची झालेली प्रगती समाधानकारक आहे का ? या प्रश्नाचा शोध घेताना मात्र मिळणारे उत्तर संमिश्र स्वरूपाचे आहे. केवळ संख्यात्मक निकष लावून सहकारी क्षेत्राचे मूल्यमापन करणे चुकीचे ठरते. गडहिंग्लज तालुक्याची क्षमता लक्षात घेता आणखी वेगाने विकास व्हावयास हवा होता. सहकारी क्षेत्रात मोठेमोठे प्रकल्प होणे गरजेचे होते. पण तसे घडले नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे तालुक्याला सर्वसमावेशक असे खंबीर नेतृत्व लाभलेले नाही हेच होय. पूर्व भागात राजकुमार हत्तरगी, पश्चिम भागात प्रा. किसनराव कुराडे, उत्तरेकडे बाबासाहेब कुपेकर अशी नेतृत्वाची विभागणी झाली आहे. संपूर्ण तालुक्याला रचनात्मक दिशा देण्यासाठी व सर्व गटातटांना एकत्रित घेऊन जाणारा नेता असणे ही या तालुक्याच्या आर्थिक विकासासाठी अत्यंत गरजेची गोष्ट आहे. गडहिंग्लज तालुक्यात सहकारी चळवळीला पोषक असे वातावरण आहे. या वातावरणाला अनुकूल पावले उचलणे गरजेचे आहे. तरच मुक्त अर्थव्यवस्थेच्या वावटळीतही गडहिंग्लज तालुक्यातील सहकारी चळवळीची वाटचाल तितक्याच वेगाने होऊ शकेल. [30]

## राजकीय, सामाजिक चळवळी

गडहिंग्लज हे जसे शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात सतत धडपडत राहणारे शहर आहे, तसेच ते सामाजिक – राजकीय चळवळीतही अग्रेसर असे शहर आहे. गडहिंग्लज शहरात आज अनेक सामाजिक – राजकीय चळवळी चालू आहेत. पण हे एकदम उगवलेले रान नाही. त्याला गेल्या साठ-सत्तर वर्षांचा संदर्भ आहे. खरे तर प्रतापराव गुजरांच्या बलिदानाने अभिषिक्त झालेल्या या भूमीत क्षात्रतेजाचा आविष्कार सतत दिसत आला आहे. जागरूकता आणि जाण वाढती राहिली आहे.

या जाणिवेचा परिणाम म्हणून हे शहर आणि हा परिसर स्वातंत्र्य चळवळीत मागे राहिला नाही. स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश (महाराष्ट्र राज्य पश्चिम विभाग खंड इ. १९८०) या ग्रंथात कोल्हापूर जिल्ह्यातील पान १ ते ७५ मध्ये स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. (हलकर्णी येथील स्वातंत्र्य सैनिक डॉ. धूम यांच्याकडून उपलब्ध ग्रंथ) त्यात १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहात गडहिंग्लज येथील श्री. फुलाराम गुजर, श्री. गोविंद कंठी यांनी शिरोडा येथे व गोविंद कुरबेट्टी यांनी मुंबईत मीठ सत्याग्रह पिकेटींग मध्ये भाग घेतल्याचा व श्री. गुजर यांना ७ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाल्याचा उल्लेख आहे. या घटनेपासून परदेशी वस्तूंचा बहिष्काराची आणि स्वदेशी वस्तूंच्या वापराची चळवळ येथे सुरु झाली.

श्री. शंकरराव जोशी या गांधीभक्त, राष्ट्रसेवक शिक्षकाच्या प्रेरणेने येथे खादीची चळवळ सुरु झाली. १९३२ मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत

भाग घेतल्याबद्दल श्री. गोविंद कंठी यांना अडीच वर्षे सक्त मजुरी आणि ५०० रुपये दंड तसेच श्री. गोविंद कुरबेट्टी यांना बेळगांव येथे ६ ।। महिने सक्त मजुरी अशा शिक्षा झाल्या.

संस्थानात, राष्ट्रीय चळवळीचा एक भाग म्हणून प्रजा परिषदेची स्थापना झाल्यानंतर कोल्हापूर येथे शेतकरी मोर्चा आणण्यात आला. शेतकऱ्यांच्या वेगवेगळ्या मागण्यांचा हा पहिला मोर्चा होय. यात गडहिंग्लज, नूल, हलकर्णी येथील स्वातंत्र्यप्रेमी तरुण सहभागी झाले. १९३९ साली श्री. फुलाराम गुजर यांना १ महिना सक्त मजुरी आणि १०० रु. दंड अशी शिक्षा झाली. श्री. श्रेष्ठी आण्णा यांना कुपवाड अधिवेशनाच्या वेळी अटक करण्यात आली. श्री. बंडाप्पाण्णा घुगरे श्री. शंकराप्पा कोरी, डॉ. धूप, श्री. गोपाळ सुतार इ. मंडळींचा प्रजा परिषदेच्या आंदोलनामुळे राष्ट्रीय चळवळीशी संबंध आला. परिणामत: गडहिंग्लज, गिजवणे, नूल, हलकर्णी ही चळवळीची प्रमुख केंद्र बनली.

१९४२ च्या "चले जाव" आंदोलनात अनेक व्यक्तींनी भाग घेतला. सरकारी खजिने लुटण्यात, भूमिगत राहून चळवळ चालू ठेवण्यात, भरीव काम केले. श्री. म.दुं. श्रेष्ठी यांना राधानगरी येथील सबजेलमध्ये पाच महिने स्थानबध्द ठेवण्यात आले. या खेरीज या शहरातील खालील अनेक सैनिकांनी अनेक कामात भाग घेऊन देहदंड सोसला. श्री. बंडाप्पाण्णा घुगरे, श्री. आण्णाराव आजरी, श्री. आपय्या झंवळी, श्री. काशिनाथ झंवळी, श्री. बाळाप्पा उत्तुरे, श्री. चन्नाप्पा कापसे, श्री. का.ना. कोरी, श्री. शंकरराव कोरी, श्री. बाबुराव गुडसे, श्री. मल्लाप्पा धूप, श्री. शिवलिंग पट्टणशेट्टी, श्री. वसंत संतराम पाटील, श्री. बी.डी. मजती, श्री. भिमराव लाटकर, श्री. गोपाळ सुतार, श्री. तुकाराम हावळ,

श्री. वसंत विराम पाटील इ. या महत्वाचा सहभाग होता. इ.सन १९४४ मध्ये सरकारी सक्तीच्या लेव्हीला विरोध करून येथे आंदोलन छेडले आणि जन जागरणाद्वारे लोकांच्या असंतोषाला संघटित केले.

गडहिंग्लज, हलकर्णी, नूल आणि इतर ठिकाणी चाललेल्या या स्वातंत्र्यलढयाचे मूळ प्रेरणास्थान अर्थातच म. गांधी हे होते. कोल्हापूर जिल्हयात हे कार्य तेवत ठेवण्यात श्री. म.दु. श्रेष्ठी आणि देशभक्त डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार यांचा विशेष सहभाग आहे. श्री. म.दु. श्रेष्ठी हे गडहिंग्लज परिसरातीलच आहेत.

स्वातंत्र्य चळवळीच्या काळातच, तरुणांच्या मनात नव्या युगाला उपयोगी व्यापक मूल्यांची जोपासना व्हावी म्हणून राष्ट्रसेवा दलाची चळवळ सुरु झाली. ही चळवळ या तालुक्यात, सर्व दूर पसरली. यापूर्वी सत्यशोधक चळवळीने एक वातावरण तयार केले होतेच. यामुळे या शहराला एक पुरोगामी व्यापक पाया मिळाला. जीवनमूल्यांच्या व्यापक प्रयोगाला आधार मिळाला. जाती, धर्मात विभागलेल्या या समाजाला जाती, धर्मातील व्यापक मानवीय आधार देणाऱ्या या चळवळीमुळे महात्मा गांधीजींच्या वधानंतर ब्राम्हणांची घरे जाळली जात असता स्वतःचा जीव धोक्यात घालून अतुल पराक्रम करणारे राष्ट्रपती पुरस्कार विजेते श्री. सि.मा. रानगे गुरुजींसारखे तरुण या भागात निर्माण होऊ शकले.

आजच्या क्षुद्र, स्वार्थी आणि मूल्यहीन राजकीय धकाधकीच्या काळातही एक व्यापक, मूल्याधिष्ठित जीवनाशय देणाऱ्या या चळवळीचा पाया येथे अजूनही टिकून आहे, हे विशेष. आज सर्वत्र नको त्या प्रवृत्ती

डोके वर काढत आहेत. तथापि आजही गडहिंग्लज येथे एक वैचारिक स्तर टिकून आहे.

राष्ट्रीय व न्याय हक्काच्या संघर्षात हे शहर आणि तालुका नेहमीच जागरूक राहिले आहेत. भाषावार प्रांत रचनेमध्ये महाराष्ट्रावर जो अन्याय केला गेला त्याचा निषेध म्हणून गडहिंग्लजमध्ये आंदोलने झालीच पण त्या-बरोबरच गडहिंग्लज नगरपालिकेने या घटनेचा निषेध ठराव एकमताने केला आणि १९५६ साली निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी सभासदपदाचे राजीनामे देऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाप्रमाणेच गोवा मुक्ती सत्याग्रह, कच्छचा सत्याग्रह या राष्ट्रीय आंदोलनातही येथील सूज्ञ मंडळींनी कार्य केले आहे.

या पद्धतीच्या राजकीय चळवळीच्या बरोबरच सामाजिक सुधारणांच्या चळवळीतही गडहिंग्लजचे योगदान महत्वाचे आहे. देवदासी प्रथा ही समाजाच्या मस्तकावरील गळूप्रमाणे आहे. या समस्येला हात घालून १९७५ साली देशातील पहिली देवदासी परिषद भरविण्याचे आणि ही समस्या लोकमाणसापुढे सतत ठेवून त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्याचा सातत्याने प्रयत्न करण्याचे काम गडहिंग्लजने केले आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत हा प्रश्न मांडून देवदासींच्या विकासासाठी बजेटमध्ये तरतूद करून घेण्याचे काम ही येथील लोकप्रिय आमदार श्रीपतराव शिंदे यांनीच केले आहे. हा प्रश्न देश-पातळीवर पोहचविणे, महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांत योग्य ते करवून घेणे या दृष्टीने गडहिंग्लज तालुक्याने महत्वाचे कार्य केले आहे.

दलित, भटके, धनगर, माकडवाले, फासेपारधी, बेरड इत्यादी समाजाचे अनेक प्रश्न घेऊन त्यांची आंदोलने चालू ठेवण्याचे काम हेही एक गडहिंग्लज तालुक्याचे एक खास वैशिष्टय म्हणता येईल.

विद्यार्थी, स्त्री-मुक्ती आणि इतर राष्ट्रीय सामाजिक दृष्टया महत्वाच्या प्रश्नांची जाण असणारी मंडळी येथे आहेत. त्यामुळे बाल आनंद मेळाव्यासारखे सांस्कृतिक उपक्रम असोत, स्त्री-मुक्तीसारखे मेळावे असोत वा लोकविज्ञानासारखे मेळावे असोत या सर्वांचे येथे योग्य स्वागत होते. लोक-जागृतीशीही पैसा घालवणारी परंतु समाज स्वास्थ्याच्या दृष्टीने गरजेची कामे सतत चालू ठेवण्याची जाण आणि त्यासाठी गरजेची धडपड करणारी मंडळी या परिसरात आहेत, हीच या नगरीची, तालुक्याची अस्मिता होय.

स्वातंत्र्यानंतर शासकीय, अशासकीय अशा अनेक महत्वाच्या चळवळी येथे लढल्या - लढविल्या गेल्या, त्यांना एक वैचारिक अधिष्ठान दिले गेले. अर्थात या सर्वांची नोंद केवळ अशक्य आहे. तथापि या सर्वांद्वारे एक व्यापक राष्ट्रीय दृष्टी निर्माण करण्याचे, ती वाढती ठेवण्याचे काम येथे होत आहे. हे या तालुक्याचे खास वैशिष्टय आहे. [३१]

## गडहिंग्लज तालुक्याचे राजकारण

गडहिंग्लज विधानसभा मतदार संघाचा स्वातंत्र्यानंतर इतिहास पडताळता कॉंग्रेस अंतर्गत लाथाळीने विरोधी पक्षाच्या उमेदवारात अधूनमधून आमदार होण्याची संधी मिळत गेली आहे. १९५२ पासूनच्या निवडणुका पाहिल्या तर प्रत्येक वेळी नवीन चेहरा मागणारा हा मतदार संघ आहे. गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणाचा आढावा घेतला असता, आपणास लक्षात येते, की १९५२ ला कॉंग्रेसचे म.दुं. श्रेष्ठी, १९५७ ला शेतकरी कामगार पक्षाचे डी.एस्. नार्वेकर, १९६२ ला कॉंग्रेसचे आप्पासाहेब नलवडे, १९६७ ला शेतकरी कामगार पक्षाचे तुकाराम कोलेकर, १९७२ ला बी.एस्.

पाटील, १९७८ ला काँग्रेसचे डॉ. शिवलिंग चाळी, १९८० ला काँग्रेस (इंदिरा) डॉ. शिवलिंग चाळी, १९८५ ला जनता पक्षाचे श्रीपतराव शिंदे, १९९० ला जनता पक्षाचे श्रीपतराव शिंदे आणि १९९५ ला बाबासाहेब कुपेकर असे उमेदवार विजयी झाले आहेत. १९५७ ला डी.एस. नार्वेकर तर १९६७ ला तुकाराम कोलेकर या दोन शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवाराना आमदार होण्याची संधी मिळाली. काँग्रेस (इंदिरा)चे डॉ. शिवलिंग चाळी यांना १९७८ व १९८० ला दोनवेळा सलग संधी मिळाली. तसेच १९८५ व १९९० ला जनता दलाचे उमेदवार श्रीपतराव शिंदे यांना सलग दोनवेळा आमदार पदाची संधी मिळाली. या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते ती ही की आजअखेर काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून परिचित असलेला हा तालुका जनता पक्षाचा बालेकिल्ला बनला. १९७८ व १९८० ला झालेल्या निवडणुकीमध्ये डॉ. शिवलिंग चाळी यांचेकडून जनता दलाचे उमेदवार श्रीपतराव शिंदे पराभूत झाले होते. परंतु १९८५ व १९९० साली झालेल्या निवडणुकीमध्ये जनता पक्षाचे श्रीपतराव शिंदे विजयी होऊन त्यांनी आपले राजकारणात पाय घट्ट रोवले. सध्या नेतृत्वाअभावी काँग्रेस पक्षाची पूर्ण वाताहत झाली आहे. डॉ. शिवलिंग चाळी यांचा १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत पराभव झाला आणि गडहिंग्लज तालुक्यातील काँग्रेस (आय) च्या अभेद्य किल्ल्याला खिंडार पडले. त्यावेळेपासून काँग्रेस पक्षाला उतरती कळा लागली आहे.

## अभ्यासाचा उद्देश आणि संशोधन पध्दती

प्रस्तुत प्रबंधामध्ये गडहिंग्लज तालुक्यातील स्थानिक राजकारणाचा अभ्यास करण्यात येणार आहे. स्थानिक राजकारण हे राज्यस्तरावरील

राजकारण आणि केंद्रस्तरावरील राजकारण याचे प्रभावीत झालेले असते. राज्यस्तरावरील राजकारणातील आणि स्थानिक राजकारणातील विविध राजकीय शक्ती ज्यावेळी एका गटाच्या पाठीमागे उभ्या राहतात त्यावेळी तो गट प्रबळ बनतो आणि यशस्वी होतो. गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणाच्या अभ्यासाची खालील उद्दिष्टये आहेत.

१) स्थानिक राजकारणामध्ये विशेषत: गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणामध्ये विविध राजकीय पक्षांनी कशाप्रकारे आपल्या भूमिका बजावल्या यांचा अभ्यास करणे.

२) स्थानिक राजकारणात सहकारी साखर कारखाना, नगरपालिका आणि पंचायत समिती या राजकीय संस्थांची महत्वाची भूमिका असते. या विविध संस्थांनी तालुक्याच्या राजकारणावर कशाप्रकारे प्रभाव टाकला आहे. या संस्थांची भूमिका कोणती असते आणि त्यांचा विकास कार्यासाठी काय फायदा होतो ते अभ्यासणे.

३) राज्यस्तरीय राजकारणाचा स्थानिक राजकारणावर कसा प्रभाव पडतो ते पहाणे.

४) स्थानिक राजकारणातून नवे नेतृत्व कशाप्रकारे पुढे येते ? गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणामध्ये श्री. श्रीपतराव शिंदे यांचे नेतृत्व गेल्या दहा वर्षामध्ये कशाप्रकारे निर्माण झाले ? याचा अभ्यास करणे.

५) तालुक्याच्या राजकारणामध्ये विविध गट का ? व कसे निर्माण होतात. हे राजकीय गट आपले राजकीय सामर्थ्य कशाप्रकारे संघटित करतात ? याचा अभ्यास करणे.

६) राजकीय नेत्यांनी तालुक्याच्या विकासाचे प्रश्न किती प्रमाणात धसास लावले ? गटबाजीमुळे राजकीय विकास होतो की विकासाला खीळ बसते ते पहाणे. ही या शोध प्रबंधाच्या अभ्यासाची मुख्य उद्दिष्टये आहेत.

आज स्थानिक राजकारणाचा अभ्यास करणे अत्यंत महत्वाचे बनले आहे. कारण त्याशिवाय राज्यस्तरीय आणि केंद्रस्तरीय राजकारणामागची पार्श्वभूमी लक्षात येणार नाही. स्थानिक राजकारणात विविध राजकीय संस्थांच्या प्रमाणेच नेतृत्वाची भूमिकाही महत्वाची असते. या नेतृत्वाची विकास कामात महत्वाची भूमिका असते. प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये गडहिंग्लज तालुक्यातील पक्षीय राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे. गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात सन १९८५ नंतर जुने राजकीय नेतृत्व अस्तंगत झाले आणि ॲड. श्रीपतराव शिंदे यांचे नवे नेतृत्व उदयास आले. सन १९८५ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणाला कलाटणी मिळाली. त्यानंतरच्या काळात त्यांनी तालुका पातळीवर सत्तास्थाने सहकारी साखर कारखाना, नगरपालिका, पंचायत समिती अशा विविध संस्थांच्या माध्यमाने आपली सत्ता बळकट केली. सन १९९० विधानसभा निवडणुकीतही आपली आमदार पदाची जागा कायम ठेवली. गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्यामध्ये सत्तांतर घडून आले आणि कारखान्याच्या चेअरमनपदाची माळ आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या गळ्यात पडली. गडहिंग्लज नगरपालिकेवरही काही काळ जनता पक्षाने विजयाचा झेंडा फडकविला. या पार्श्वभूमीवर गेल्या दहा वर्षामध्ये नवनेतृत्व कसे विकसित झाले हे अभ्यासण्याचा मुख्य हेतू आहे.

सदर शोध प्रबंधाच्या अभ्यासासाठी साखर कारखाना, नगरपालिका आणि पंचायत समिती यांची इतिवृत्ते, अहवाल, स्थानिक वर्तमानपत्रे,

स्मरणिका, निरनिराळी पत्रके, पुस्तके व इतर दुय्यम स्वरुपाची साधने वापरण्यात आली आहेत. ऐतिहासिक दृष्टिकोनातून गडहिंग्लज तालुक्यातील गेल्या १० वर्षांच्या राजकारणाचे साधार, सूत्रबध्द आणि टीकात्मक असे विवेचन करण्यात आले आहे. या अभ्यासासाठी ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब केला आहे. त्यानुसार पूर्वी घडलेल्या घटनांची क्रमवार आणि सुसंगत रितीने मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

.....

## प्रकरण पहिले

## संदर्भसूची


१) गरुड शांताराम (संपा.) - महाराष्ट्र राज्य रौप्यमहोत्सवी वर्ष, कृषी औद्योगिक समाजाची २५ वर्षे, मे, १९८५, समाजवादी प्रबोधिनी प्रकाशन, इचलकरंजी,
लेख - ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय बदलाचे स्वरूप, पृष्ठ नं. ५४.

२) Contemporary India. Socio - Economic and Political Processes by Editorial Committee N.R. Inamdar and others, Continental Prakashan, Poona-30, First Edition 1982, Page No. 7.

३) कामत अ.रा. - स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील अर्थकारण आणि राजकारण भाग - २, तात्पर्य मे, १९८१ (संपा. सुधीर बेडेकर) पृष्ठ नं. १७.

४) कु. शेंडे ज.दा. - फलटण तालुक्यातील पक्षीय राजकारण (इ.स.१९७७ ते १९८५) एक टीकात्मक अभ्यास, शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. (राज्यशास्त्र) पदवी परीक्षेसाठी सादर केलेला अप्रकाशित शोध निबंध, ५ मे, १९८७, पृष्ठ नं. ५,६.

५) गरुड शांताराम (संपा.) तत्रैव, पृष्ठ नं. ६२, ६३.

६) तत्रैव, पृष्ठ नं. २.

७ ) माने डी.ए. - शिल्पकार यशवंतराव चव्हाण, नयन प्रकाशन, विसापूर, ता. तासगाव, जि. सांगली, पृष्ठ नं. १७, १८.

८) पाटील रा.तु. - सांगली-सातारा-याचे राजकारण, परख प्रकाशन, तडसर, जि. सांगली, पृष्ठ नं. ५१, ५२.

९) जैन अशोक - महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शेठ पब्लिशर्स लिमिटेड, मुंबई, प्रकाशन जून, १९९३, पृष्ठ नं. १.

१०) तत्रैव, पृष्ठ नं. ६.

११) गरुड शांताराम (संपा.) - कृषी औद्योगिक समाजाची वाटचाल, तत्रैव, पृष्ठ नं. २, ३, ४.

१२) तत्रैव, पृष्ठ नं. १३, १४.

१३) तत्रैव, पृष्ठ नं. ७, ८.

१४) तत्रैव, पृष्ठ नं. ८, ९.

१५) तत्रैव, पृष्ठ नं. २२.

१६) देशपांडे एम्.डी. - पंचायत राज्य परिवर्तनाचे नवे पर्व, समाजवादी प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, दि. १.८.१९८९, पृष्ठ नं.१८.

१७) कामत अ.रा. - स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील अर्थकारण आणि राजकारण भाग-२, तात्पर्य मे, १९८१, (संपा. सुधीर बेडेकर), पृष्ठ नं. १८, १९.

१८) कामत अ.रा. - स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील अर्थकारण आणि राजकारण भाग-२, तात्पर्य, मे, १९८१, (संपा. सुधीर बेडेकर), पृष्ठ नं. १८, १९.

१९) फडणीस जगन - शरद पवार धोरणे आणि परिणाम, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, जानेवारी, १९९५, पृष्ठ नं. ३, ४, ५.

२०) गरुड शांताराम (संपा.) - तत्रैव, पृष्ठ नं. ७७, ७८, ७९.

२१) कामत अ.रा. - तत्रैव, पृष्ठ नं. १६, १७.

२२) गरुड शांताराम (संपा.) - तत्रैव, पृष्ठ नं. ५४, ५५, ५९, ६३.

२३) गोकाक्कर सुधाकर, चराटी शामराव (संपा) - हिरण्यकेशीच्या काठी, गडहिंग्लज नगरपालिका शताब्दी स्मृतिग्रंथ, प्रकाशन जानेवारी, १९८९, पृष्ठ नं. १, २, ३, महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, मुंबई, १९६०, पृष्ठ नं.२.

२४) गडहिंग्लज तालुका तहसिलदार कार्यालय अहवाल.

२५) गोकाक्कर सुधाकर, चराटी शामराव (संपा.) - तत्रैव, पृष्ठ नं. २०२,

२६) तत्रैस, पृष्ठ नं. ३, ४.
महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, मुंबई, १९६०, पृष्ठ नं. ८३९.

२७) गोकाक्कर सुधाकर, चराटी शामराव (संपा.) तत्रैव, पृष्ठ नं. ४, ५.

२८) दैनिक सकाळ, कोल्हापूर - दि. २९ सप्टेंबर, १९९५,
भारतीय संस्कृती कोश - खंड दहावा, पृष्ठ नं. ३२९.

२९) गोकाक्कर सुधाकर, चराटी शामराव (संपा.) - तत्रैव, पृष्ठ नं. २.

३०) दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. ३०.११.९१,
दैनिक सकाळ, कोल्हापूर, दि. ३०.११.९४,
सहकार विशेषांक पुरवणी.

३१) गोकाक्कर सुधाकर, चराटी शामराव (संपा.) - तत्रैव,
पृष्ठ क्र. ११, १२, १३, १४ व १५.

.....